
ebook
'जय हो !..'
- संगीतकार : ए. आर. रहेमान
लेखक - अनंत पावसकर

# 'जय हो!..' - संगीतकार : ए. आर. रहेमान

★ लेखक : अनंत पावसकर



'स्लमडॉग मिलेनियर' या सिनेमाला 'ऑस्कर'साठी नामांकन मिळून, त्याने दहापैकी आठ विभागात विजेतेपद मिळवलंय.. ही वृत्तपत्रात झळकलेली बातमी वाचून लोक थक्क झाले होते. (ती तारीख होती २२ फेब्रुवारी, २००९, म्हणजे चक्क पंधरा वर्षे झालीत या गोष्टीला!) हिन्दुस्थानी चित्रपटसंगीताच्या इतिहासात, कुठल्याच संगीतकाराला तोपावेतो 'ऑस्कर' मिळालेलं नव्हतं, हे खरंय! तेव्हा 'संगीतकार ए. आर. रहेमान' हे नाव संगीत-रसिकांसाठी तसं नवखं नव्हतं. 'रोजा' (१९९२) पासूनच तो लोकांच्या गळ्यातला ताईत झाला होता. त्याने वेगळी वाट चोखाळत हिन्दुस्थानी चित्रपटसंगीताला एका वेगळ्या वळणावर आणून ठेवलंय, हेही ते जाणून होते. बाय द वे! रहेमान 'ग्रेट' आहे यात वादच नाही पण केवळ या 'क्वालिफिकेशनमुळे', तो सन्माननीय संगीतकार नौशादजी, सी. रामचंद्रजी, मदनमोहनजी, शंकर-जयकिशन साहेब, सचिनदा, पंचमदा, चित्रगुप्त, लक्ष्मी-प्यारेजींसह अनेक संगीतकारांपेक्षा मोठा आहे, असं म्हणताच येणार नाही. कारण 'हर जर्रा, अपनी जगह, एक 'आफताब' होता है!' परंतु नौशादजींचा 'आन' (१९५२) ते 'व्हीनस' कंपनीचा 'खिलाडी' (१९९२) हा केवळ याच चार दशकांचा विचार केला ना तर, अनेक थक्क करणारे टप्पे दृष्टीपथात येतात! या काळात हिंदी चित्रपटातील संगीतात, नेमकी काय स्थित्यंतरे झाली, त्याचाच सविस्तरपणे मागोवा घेणारा हा लेखाजोखा! नक्की शांतपणे वाचा! मजा आएगा!

मणिरत्नमकृत 'दिल से...' चं पोस्टर आमच्या 'व्हीनस कंपनीच्या' रिसेप्शनमध्ये लावलं गेल्यामुळे माझ्या नजरेखालून गेलेलं खरं. पण ते त्याक्षणी ते इतकं पुचाट वाटलं होतं की बस्स.. रे बस्स!! कारण ते अमुक चित्रपटाचं 'टायटल' असण्यापेक्षा, एखाद्या 'रोमॅण्टिक' ड्युएट अल्बमसारखंच वाटलं होतं. त्याक्षणी मला तरी ते अजिबात कॅची वाटलंच नाही. मात्र गीतकार म्हणून 'गुलजार' आणि संगीतकार म्हणून 'ए. आर. रहेमान'! ही नावं वाचताच कुतुहल वाटलेलं. एखाद्या म्युझिक कंपनीने, अमुक चित्रपटाच्या संगीताचे हक्क विकत घेतले ना? की त्यातील गाण्यांच्या दोन 'मास्टर टेप्स' संबंधित कंपनीकडे पाठवल्या जातात. एकात मूळ गाणी आणि आणि दुसऱ्या टेपमध्ये 'कॉपीराईट कायद्यानुसार' त्या गाण्यांचे मूळ 'म्युझिक-ट्रॅक्स' अशा दोन टेप्स पाठवल्या जातात, हा आमच्या म्युझिक इंडस्ट्रीतला अगदी आजही शिरस्ता आहे! एकीकडे, 'दिल से..'ची म्युझिक-रिलिज पार्टी लवकरच आयोजित होत असल्याचं कळलं होतं आणि त्याच दिवशी.. दुपारी आमच्या ऑफिसातला एक जण 'मास्टर टेप्सचा' चक्क एक बॉक्स आणि माझ्यासाठी 'निमंत्रण पत्रिका' घेऊन हजर झाला! त्या फंक्शनमध्ये वाजवण्यासाठी गाण्यांची एक सीडी-ट्रान्सफर सुद्धा नक्की द्या.. हे आवर्जून म्हणाला. बाप रे! नेहमी दोनच टेप्स येतात ना?. मग हा एवढा मोठा बॉक्स कशाला?.. काय आहे यात? बॉक्स उघडून पाहतो तो काय! एकाच चित्रपटाच्या गाण्यांच्या दहा टेप्स! ('डिजिटल ऑडिओ टेप्स'! म्हणजे अर्थात 'डीएटी'! त्याला इंग्रजीत 'डॅटस्' अशी संज्ञा आहे!) चित्रपटात एकूण सहा गाणी आहेत ना? मग या एकाच चित्रपटाच्या गाण्याच्या इतक्या टेप्स कशाला? आश्चर्य वाटलं! निमंत्रण पत्रिकेवरून समजलं, की 'दिल से..' च्या 'ऑडिओ' अल्बमचं म्युझिक-रिलिज फंक्शन, अगदी परवाच, थेट दक्षिण मुंबईच्या टोकाला असलेल्या 'ऑबेरॉय'मध्ये आयोजित करण्यात आलंय. या कार्यक्रमाला स्वरसम्राज्ञी लतादीदी, शाहरुख, मनिषा कोईराला इ. स्टार येणार होते,. तसंच या सोहळयात मणिरत्नमसाहेब , रामगोपाल वर्माजी, शेखर कपूरजी वगैरे अगदी व्हीव्हीआयपी मंडळी येणार होते, म्हणून बॉस त्या 'मोठ्या' अशा कार्यक्रमाच्या आयोजनात अतिशय व्यस्त होते. संभ्रमात असूनही, मी सरळ त्या टेप्सचा बॉक्स माझ्या टेबलावर रिता केला. पाहतो तर काय! प्रत्येक टेपवर अगदी विगतवार अशी माहिती होती. (मला नंतर माहीत झालं की, या सूचना ए. आर. रहेमान यांच्या टीममधील 'एच. श्रीधर' या जिनियस रेकॉर्डिंग इंजिनियरने लिहिल्या होत्या.) स्टिरिओ मिक्स फॉर सीडी, स्टिरिओ मिक्स फॉर कॅसेट, रेडिओ कॉपी, मोनो मिक्स, मेन मिक्स फॉर प्रोमो... वगैरे! (संगीतकार ए. आर. रहेमान यांनी, काही चित्रपटांनंतर, आपल्या गाण्यांचे म्युझिक-ट्रॅक्स देणं पूर्णतः बंद केलं होतं!) सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्या टेप्सवर.. मास्टरींग करणाऱ्याच्या माहितीसाठी, सूचना होत्या - काय? तर 'नो फरदर इक्यू प्लीज!' असं ठळकपणे लिहिलं होतं.. ('इक्यू' म्हणजे 'इक्विलाईझेशन' नावाची साऊंड-प्रोसेस) थोडक्यात सांगायचं तर!.. 'जसं दिलंय तसं गपगुमान वापरा..' अशी ती जणू धमकीवजा सूचना ठळकपणे लिहिलेली! नंतर लक्षात आलं की, त्यांनी असं लिहिण्याचं कारण एवढंच होतं की, मास्टरींग करणारे काही महाभाग गरज नसतानाही आपलं (अगाध) ज्ञान वापरून, हातात सापडलेल्या मास्टरवर, स्वतःला हवे तसे तांत्रिक सोपस्कार करतात. मनाला वाटेल तसं 'इक्यू' करत असतात. रेकॉर्ड/टेप वरील मर्यादित वेळेचं कारण देत गाण्यांची निर्दयपणे कापा-कापी करतात किंवा गाणी हवी तशी एडीट करून अक्षरशः त्या गाण्यांची अक्षरशः वाट लावतात. (याबाबतीत तुम्हाला एक उदाहरण सांगू? दिग्गज संगीतकार 'सोनिक-ओमी' यांचा 'दिल ने फिर याद किया' (१९६६) आठवा! सगळीच गाणी मस्त आहेत त्यातली! 'एच.एम.व्ही'ने या सिनेमातली गाणी पूर्ण स्वरूपात 'एल.पी.' रेकॉर्डवर आणली होती का? हे माहीत नाही. कारण आम्ही तेव्हा लहान होतो. आत्ता 'यू-ट्युब'वर त्या चित्रपटातली ऑडिओ म्हणून दिलेली गाणी ऐका! आणि तीच गाणी उपलब्ध असलेल्या व्हिडिओजवर पहा! काय यार! का? गाण्यांचं सादरीकरण 'ईपी' रेकॉर्डवर सादर करण्यासाठी, संबंधित मास्टरींग करणाऱ्या 'माखनचोर' रेकॉडिस्टने किती निर्दयपणे 'एडिट' केलंय ते ऐका! पहा! अनुभवा!) तर एखाद्या निघृण व विकृत मनोवृत्तीच्या कसायांच्या हाती आपलं लाडकं कोकरू, नाहक 'हलाल' होऊ नये म्हणून, 'त्या' अनुभवी माणसाने शालजोडीतून हाणलेला हा टोला होता! असो! तर अशाप्रकारे.. 'ए. आर. रहेमान'चा एक पैलू, हा असा सामोरा आला. आम्ही त्या 'स्टिरिओ मिक्स डॅटवर'

असलेली गाणी एका सीडीवर ट्रान्सफर करून, एकदाचे कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचलो. तुफान गर्दी होती निमंत्रितांची! एकेक स्टार येत होता. मैफल सजत होती! संगीतकार ए. आर. रहेमान हे नाव माझ्यासाठी तसं पहायला गेलं तर, नवं नव्हतं, पण त्याला 'रुबरू' मात्र मी प्रथमच पाहत होतो. पोरगेलासा, मितभाषी, पण चेहऱ्यावर विद्वत्तेचं तेज असलेला, निरागस दिसणारा असा 'संगीतकार ए. आर. रहेमान'! थक्क झालो क्षणभर! असो! या कार्यक्रमात 'चल छैया छैया..' या गाण्यावर आपला शाहरूख खान अस्सा धम्माल नाचलाय म्हणून सांगू? ('विकिपिडिया' मधील नोंदीनुसार 'चल छैया छैया..' ही धून व चाल, खरंतर 'वंदे मातरम' (१९९७) या अल्बममध्ये वापरायचं जवळजवळ निश्चित झालं होतं, परंतु त्या अल्बममधल्या इतर गाण्यांच्या संगीत-प्रकृतीला ते साजेसं ठरणार नाही, म्हणून ती आईडिया गुंडाळण्यात आली, असा स्पष्ट उल्लेख आहे!) 'ए. मणिवन्नन' हा आमचा रेकॉर्डिस्ट, मद्रासी असल्याने एक फायदा झाला. संगीतकार ए. आर. रहेमान, त्यांचे ध्वनिमुद्रक एच. श्रीधर तसेच तालवाद्यातले अनभिषिक्त सम्राट 'शिवमणी' याच्याशी डायरेक्ट जानपहेचान झाली, हे विशेष!. कारण एकच! त्यांना होता भाषेचा अडसर! हिन्दी इल्ले! भोवती पत्रकारांचा गराडा पडताच त्यांनी आम्हां दोघांना आमचे हात धरून अक्षरशः बळेबळेच आपल्यासोबत थांबवलं! पुढचा एक तास आम्ही सर्व जण एकत्र होतो, कारण माझ्या स्टुडिओतला तो (मद्रासी) रेकॉर्डिस्ट एकीकडे, दुभाष्याचं काम अगदी बिनबोभाट पार पाडत होता, वर.. घरचं कार्य असल्याप्रमाणे त्यांची खातीरदारीही करत होता. आमच्या



'दिल से..' पार्टीत.. शिवमणी, एच. श्रीधर, ए. आर. रहेमान आणि मी..

गप्पांच्या ओघात आम्हाला समजलं, की संगीतकार ए. आर. रहेमान, रेकॉर्डिस्ट श्रीधर आणि तालसम्राट शिवमणी, आणि त्यांच्या सोबतची त्यांची संपूर्ण टीम, आमच्या स्टुडिओपासून जवळच असलेल्या जुहूच्या 'सेंटॉर' मध्येच मुक्कामाला आहेत! (त्यांच्या निवासाची 'फाईव्ह-स्टार' व्यवस्था आमच्या 'बॉसनेच' केली होती, कारण ते 'सेंटॉरचे' लाईफ-मेंबर आहेत, बरं!) मग काय? आम्ही त्या तिघांना 'सेंटॉर' पासून केवळ अर्ध्या किलोमीटर अंतरावर

असलेल्या, आमच्या 'व्हीनस' कंपनीच्या 'ब्ल्यू-डायमंड' या स्टुडिओला, सदिच्छा भेट द्या, असं मनापासून विनवलं! ते हसले! एखाद्या म्युझिक कंपनीचा 'म्युझिक-स्टुडिओ' तो काय? एखादा सामान्य असा, छोटासा 'मिक्सर' आणि त्यात एखाद्या सामान्य 'रेकॉर्डरवर' गाण्यांचं 'रेकॉर्डिंग' होत असेल, असा त्यांचा बहुदा समज असावा! ते आले! मी तातडीने आमच्या बॉसना बोलावून घेतलं. आमचा भव्य स्टुडिओ, त्यातील अद्ययावत यंत्रणा, तसंच तिथला 'ओटारी' कंपनीचा भव्य 'मिक्सिंग कॉन्सोल', 'टास्कॅम हाय-एट् रेकॉर्डर' वगैरे पाहून ते थक्क झाले. केवळ 'ब्लॅंक!!' नंतर अत्यंत आपलेपणा वाटल्यानेच ते आमच्यासोबत बराच वेळ रमले. मस्त गप्पा झाल्या. आमच्यासोबत त्यांनी भोजनाचा आस्वादही घेतला. संगीतकार ए. आर. रहेमान, शिवमणी व ध्वनिमुद्रक एच. श्रीधरजींच्या या स्टुडिओ भेटीतून, तसेच त्यांच्याशी झालेल्या प्रदीर्घ गप्पांमधून, संगीतकार ए. आर. रहेमान ही काय चीज आहे ते मला कळलं. (मी लागलीच 'दैनिक सामना'च्या 'फुलोरा' पुरवणीत संगीतकार ए. आर. रहेमान यांच्यावर एक छान कव्हर-स्टोरी केली.) जिनियस रेकॉर्डिंग इंजिनियर 'एच. श्रीधर' यांनी 'दिल से..'च्या ऑडिओ मास्टरींगबाबत आपलेपणाने पुनःपुन्हा सूचना दिल्या. (पण.. आमचा 'मास्टरिंगवाला'! हे प्रभू!) याचा मला एक फायदा मात्र नक्की झाला. 'ऑडिओ' ध्वनिमुद्रण, त्याचं मिक्सिंग/एडिटिंग/मास्टरींग यातील बरेच नीरक्षीरविवेक मला, माझ्या स्वतःसाठी तरी दृग्गोचर झाले. 'म्युझिक इन्चार्ज' असल्याने ते पुढे मला खूपच उपयुक्त ठरले, हे नक्की! नवं काहीतरी शिकायला मिळालं. तुम्ही 'चल छैया छैया..' हे गाणं कुठल्याही प्लेअरवर ऐका. (मी तुमच्या अभ्यासासाठी म्हणून..'यू-ट्युब' च्या 'लिंक्स' देतोय! त्या नक्की अभ्यासा! इच्छुकांनी तर 'पी.एच.डी' करा!) घरातली सिस्टिम असो की रिक्षातला कॅसेट-प्लेअर, 'डीजेवाला' लाऊड-स्पीकर असो, की पानाची टपरी! गाण्यातली खुमारी तसुभरही कमी होत नाही हे विशेष! न्हिदम -म्युझिकचा इम्पॅक्ट सगळीकडे सारखाच. ही किमया आहे संगीतकाराची, साऊंड-इंजिनियरची! त्यांच्या तांत्रिक ज्ञानाची! ही आठवण विस्तारानं सांगण्याचं प्रयोजन एवढंच होतं, की ए. आर. रहेमान हा नुसताच संगीतकार नाहीय. तर त्यात दडलाय एक विलक्षण प्रतिभावंत तंत्रज्ञ. तो सूज्ञ आहे, चतुरस्र आहे. वयाच्या मानानं संगीतात बराच परिपक्व आहे. तो संगीताचा जादुगार आहे. तो शब्दांनी बोलतो कमी पण त्याचं संगीत जास्त बोलतं. त्याला भारतीय चित्रपट संगीतातलं वादळ म्हटलं जातं. संगीतप्रेमी त्याला सन्मानपूर्वक 'मोझार्ट ऑफ मद्रास' म्हणतात. त्याने भारतीय चित्रपटसंगीतावर तर अधिराज्य केलंच, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्याच्या नावाचा दबदबा आहे. काहीजण गंमतीने रहेमानचं संगीत हे 'स्लो-पॉयझन' असल्याचं म्हणतात. ज्याप्रमाणे 'स्लो-पॉयझन' हळुहळू आपला परिणाम दाखवायला सुरुवात करतं, त्याचप्रमाणे रहेमानचं संगीत रसिकश्रोत्यांवर परिणाम करतं. त्याचं कोणतही गाणं किमान चार वेळा तरी ऐकलंच पाहिजे, मगच कुठे ते गाणं समजू लागतं! अर्थात नंतर ते खूपच आवडू लागतं. हा अनुभव नक्की घ्या! (मी सोबत 'ए. आर. रहेमान' यांच्याशी संबंधित बऱ्याच 'यू-ट्युबच्या' लिंक्स दिल्या आहेत. (ते सर्व..चक्क मोजून दोन वर्षे पुरेल इतकं आहे!) भारतीय चित्रपट संगीताला आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण करून देण्यात रहेमानचा मोठा वाटा आहे. या माणसानं भारतीय चित्रपट संगीताला एका वेगळ्या वळणावर आणून ठेवलं ही वस्तुस्थिती आहे. रहेमानने संगीतरचनेतील रूढ पद्धतीपेक्षा, वेगळी पद्धत अस्तित्वात आणल्याचं बोललं जातं. आपले बुजुर्ग संगीतकार नौशादजी आणि सी. रामचंद्रजी हे असेच प्रयोगशील प्रतिभावंत तंत्रज्ञ होते. भारतीय चित्रपटसंगीत बाल्यावस्थेत असताना त्यांनी त्या काळात आपल्या किमयागारी आणि कर्तृत्वाने जे आविष्कार घडवून आणलेत ते पाहून थक्क झालेलोच ना!?

मुंबईत माटुंग्याला मद्रासी लोकांची बरीच वस्ती आहे. १९९० च्या आसपास 'रोजा' नावाच्या एका तामिळ चित्रपटातली गाणी सर्वप्रथम इथं तुफान वाजली आणि गाजली. पुढे 'रोजा' हिंदीत डब होऊन येताच तर करिष्मा झाला.



मग काय? इतर साऊथ सिनेमातल्या गाण्यांच्या कॅसेटस् वर सुद्धा लोक हावऱ्यासारखे तुटून पडले. साऊथ-इंडियन सिनेमे (वेगळ्या अर्थाने) मसालेदार असतात, असा आधी आपला समज होता ना! पण हा समज किती चुकीचा होता, हे त्यांची ती गाणी ऐकल्यावर लक्षात आलं. 'रोजा' मुळे संगीतकार ए. आर. रहेमान हे नाव सर्वतोमुखी झालं. गाणी मस्तच होती. त्यात वेगळेपण होतं! त्यातले 'न्हिदम-म्युझिक'चे पॅटर्नस् तर पूर्णतः वेगळे होते. 'रोजा' ची ही लोकप्रियता कॅश करण्यासाठी 'सोनी म्युझिक कंपनीने', या चित्रपटातली गाणी वेगवेगळया भाषांमध्ये 'डब' केली. 'रोजा' ची गाणी मराठीत सुद्धा सादर झाली आहेत बर! कवि/गीतकार जगदीश खेबुडकर, यांच्या रचनेवर पं. रवींद्र साठे, पं. सुरेश वाडकर, सुदेश भोसले, उत्तरा केळकर, अनुपमा देशपांडे इत्यादींनी ती गायली होती. ('लिंक' दिलीय.)

तुम्हाला आठवतंच असेल! याआधी काही काळ म्हणजे १९८७-८८ च्या दरम्यान, पाकिस्तानातला गायक 'हसन जहांगीर' नावाचं एक वादळ आलं होतं! 'हवा हवा .. खुशबू लुटा दे..' या व त्याच्या त्या अल्बममधील सर्व गाण्यांवर लट्टू होऊन लोक देहभान हरपलेले. संपूर्ण आशिया खंडातच नव्हे तर आखाती देशांत ते प्रचंड लोकप्रिय झालं. या पाकिस्तानी गाण्यांचा 'इम्पॅक्ट' एवढा होता की, त्या गाण्यांचं वादन चक्क आपल्या 'गणेशोत्सवात'सुद्धा व्हायचं. (एक हादरवणारी गोष्ट काय? तर आपल्या आराध्य दैवत असलेल्या, लालबाग-परळच्या 'श्री गणपतीच्या' विसर्जनाच्या मिरवणुकीत 'हवा हवा खुशबू लुटा दे..' व 'जिए जिए, जिए भुत्तो बेनझीर..' ही गाणी सन्मानानं वाजवली गेल्याचं मी स्वतः पाहिलंय/ऐकलंय. कपाळावर हात मारून घेतला! लाहौलविलाकुव्वत!) मात्र 'रोजा' मधील गाणी तुफान लोकप्रिय होताच, तेच रसिक, साऊथची गाणी ऐकून मात्र नखशिखांत थरारलेले पाहिले. साऊथची गाणी 'न्हिदम-म्युझिक'बाबतीत झकास असतात, हा फंडा पक्का होताच मग काय! नव्याचा हव्यास असणारे रसिक-वादक-संगीतकार तिथे रेंगाळताना दिसू लागले. तामिळ व तेलुगू भाषेतील गाण्यांच्या कॅसेटस्ची तर रातोरात मागणी वाढली. मला आठवतंय! 'मुक्काला मुकाबला..' (तामिळ चित्रपट 'काधलन' -१९९४) असे काहीसे शब्द असणारं एक मद्रासी गाणं (गायक : मानो व स्वर्णलता) याच इलाक्यातल्या एका बालमित्रामुळे ऐकायला मिळालं होतं. ती झपाटून टाकणारी सुरावट प्रदीप लाड या संगीतकारानं नेमकी हेरली. त्याने याच जानलेवा सुरावटींना आपलंसं करून, श्याम अनुरागी यांच्या गीतरचनेत त्याचं नवं अस मस्त सादरीकरण केलं. मग काय? ती सुरावट जॉली मुखर्जी, कविता कृष्णमूर्ती

यांच्या आवाजात हिन्दीतून सादर होताच कॅसेट-मार्केट मध्ये धूम झाली! मूळ तामिळ गाणं तसेच प्रदीप लाड कृत 'मुकाबला है प्यार का..' ही दोन्ही गाणी तुफान लोकप्रिय झाली. 'जवा नविन पोपट हा..' आणि वेसावकरांच्या कोळीगीतांवर दुनिया नाचली असेल हो, पण एक वर्षाआधी कुणी सांगितलं असतं की, आपली पोरं पुढे कधीतरी मद्रासी गाण्यांवरही नाचतील तर त्याची खुळ्यात गणना झाली असती. जवान झालेली अख्खी पिढी या सुरावटीवर फिदा झाली. नाच नाच नाचली. मला तरी वाटतं की संगीतकार ए. आर. रहेमान हे नाव सर्वसामान्यांच्या ओठावर आलं ते याच गाण्यांमुळे! 'काधलन' हा तामिळ चित्रपट पुढे 'हमसे है मुकाबला' या नावानं हिन्दीत येईपर्यंत काही काळ उलटलेला खरा पण 'मुक्काला मुकाबला..' या तामिळ गाण्याने आणि 'काधलन' (१९९४) मधल्या प्रभुदेवा याने प्रेक्षकांच्या मनावर गारुड केलं होतं. 'हमसे है मुकाबला' नेमका रिलिजवर होता. तसं पहायला गेलं तर, एखाद्या 'डब' फिल्मचे राईटस्, म्हणजे शिळ्या कढीला ऊत! त्याची किंमत फार तर जुन्या सेकंड-हॅन्ड मारुतीएवढी! पण 'हमसे है मुकाबला'ने तर कमाल केली. या 'डब' चित्रपटाचे राइटस् इतक्या भरमसाठ किंमतीत विकले गेले की, त्याची किंमत अदा करण्यासाठी दोन प्रतिस्पर्धी कंपन्यांना हातमिळवणी करावी लागली होती. (वर पायरसीचं टेन्शन होतंच!) आमची 'व्हीनस' आणि आमच्या प्रवीणभाईंच्या 'टाईम' या दोन मातब्बर कंपन्यांनी हे राईटस् घेतले. कॅसेटस्ची मार्केटमध्ये तुफान विक्री झाली. अवघे पंचवीसेक वर्षे वयोमान असलेल्या ए. आर. रहेमान या संगीतकाराचं 'मुक्काला मुकाबला, लैला ओ लैला..' हे गाणं इतकं लोकप्रिय झालं होतं की या इंन्डस्ट्रीत चक्क पंचवीस वर्षांहूनही जास्त काळ आपली कलाकीर्द गाजवणाऱ्या राजेश रोशनजींसारख्या बुजुर्ग संगीतकाराला, केवळ निर्मात्यांच्या हट्टामुळे 'मुक्काला मुकाबला..होगा..!' (सबसे बडा खिलाडी- ९ जून, १९९५ रोजी प्रदर्शित) हे गाणं करावंच लागलं. पुढे याच पावलावर पाऊल ठेऊन, कित्येक चित्रपट निर्माते, तामिळ सिनेमातून हिट झालेल्या गाण्यांचा (तो जबरदस्त ऱ्हिदम/म्युझिक आवडल्याने) तशाच प्रकारचं एखादं गाणं करा असा हट्ट किंवा धमकीवजा सूचना आपल्या संगीतकाराला करायचेच. यातले बरेचसे सन्माननीय संगीतकार त्या अमुक मिटिंगनंतर हताश झालेले किंवा वॉक-आऊट केलेले मी माझ्या डोळ्यांनी पाहिलेत. कालाय तस्मै नमः! मला 'ड्युएट' (१९९४) या तामिळ सिनेमातली, ए. आर. रहेमानने संगीतबद्ध केलेली गाणी अजूनही आठवताहेत! आधी तामिळ भाषेतली कॅसेट बाजारात आली. भाषा कळत नव्हती हो! तरीही त्या गाण्यातलं संगीत, झिंग आणणारा ऱ्हिदम यामुळेच की काय, 'कॅसेट' मस्त 'क्लिक' झालेली. विकणाऱ्यांनी खोऱ्यानं पैसा कमावला. आणि काही दिवसातच (म्हणजे १ जानेवारी, १९९४ रोजी) हीच गाणी 'तू ही मेरा दिल' (१९९४) या शीर्षकाने ('ड्युएट' हिन्दी भाषेत डब झाला होता.) मार्केटला आली. हा अल्बम चक्क 'हॉट-केक' सारखा विकली गेला. ('अंजलि अंजली, पुष्पांजलि..' हे गाणं आठवतंय ना!)

रहेमान हे नाणं खणखणीत आहे आणि ते चालतंय म्हणता तिथले आणि इथलेही निर्माते गप्प कसे बसतील? आपल्या रिजनल चित्रपटांना हिन्दीत डब केलं तर सॉलिड मार्केट मिळेल म्हणता तिथले निर्माते हरखून गेले होते. ते एकीकडे संवाद तर दुसरीकडे संगीताचं डबिंग करवून देणाऱ्या कंत्राटदारांकरवी ही कामं उरकायला लागले. हे म्युझिक-कॉन्ट्रक्टर 'छापो अने आपो..!' न करतील तर नवलच! म्युझिक-ट्रॅक्सवर शब्द कोंबले की गाणं तैयार! या काळात, या 'कंत्राटदार' असलेल्या या 'गीतकारांनी' (?) आपला रहेमानच नव्हे तर साऊथच्या इतर संगीतकारांनी मूळ तामिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम चित्रपटात दिलेल्या गाण्यांची वाट लावलीय. 'केवळ धंदा करायचा' या नादाने मनाला वाट्टेल त्या उथळ शब्दांची रचना करुन, चक्क 'व्यभिचार' केलाय. (आपल्या वीस-बावीस पिक्चरच्या गाण्यांचा बोऱ्या वाजलाय हे लक्षात येताच बहुदा संगीतकार ए. आर. रहेमान यांनी म्युझिक-कंपन्यांना आपल्या गाण्यांचे म्युझिक-ट्रॅक्स देणं बंद केलं असावं.) रहेमान आला, सुपरहिट झाला खरा पण त्याच्या सुरुवातीच्या काळात डब झालेल्या गाण्यांच्या काव्यरचनेबाबत विचार केला तर झोळी फाटकी होती. 'टेलिफोन धुन में हसनेवाली...' म्हणा किंवा, 'रुक्मिणी रुक्मिणी.. खटिया भी खटखट..' तसेच 'जुरासिक पार्क में सुंदर से जोडे..', 'पिकासो की पेन्टींग

मेरा भेजा..', 'स्ट्रॉबेरी जैसी आँखे..'! एक सर्वसामान्य रसिक, म्हणून मी उद्वेगाने विचारलेलं, कुणाला? तर माझी दोस्ती-यारी असलेल्या गीतकार पी.के. मिश्राजींना! 'हे असं तुम्ही का बरं करता? अशा काव्याला काही अर्थ आहे का? हे काय आहे यार!' असं बेधडकपणे विचारलेलं. (त्या काळात ते मुंबईत मुक्काम ठोकून होते. आमच्या 'व्हीनस कंपनी' साठी दोनेक 'राजस्थानी' भाषेतील अल्बम्स बनवण्यात व्यस्त होते.) हे महाशय तामिळ, तेलुगू गाण्यांचा भावानुवाद करून त्या गाण्यांचं हिन्दीत डबिंग करून घ्यायचे. (गीतकार पी.के. मिश्राजी! हे साहेब मुळचे राजस्थानी! हरहुन्नरी कलावंत. राजस्थानी लोकसंगीतातला एक बाप माणूस. ते मुळचे राजस्थानी खरे पण मद्रासला सेटल झालेले. गिरगावात सेटल झालेला गुजराती किंवा नाक्यावर भाजी विकणारा भय्या जितकं मराठी जाणतो ना! तितकंच त्यांना तामिळ भाषेचं ज्ञान होतं बरं!. आमचं मूळ गाव असलेल्या 'कुडाळ- पावशीत' शुद्ध 'मालवणी' भाषा बोलणारे भय्ये, आणि 'मारवाडी-वाणी' आहेत, म्हणता सर्व काही क्षम्य!) उत्तर काय मिळावं? 'हम भी क्या करे? पर्देपर आर्टीस्ट का जैसा मुँह हिलता है वैसे.. या उसके आसपास के, शब्दों का प्रयोग करना पडता है!' आम्ही अवाक्! 'गुरूजी.. 'उठ.. मारिचा.. उठ!' ऐसा मराठी शब्द आया.. तो क्या लिखेंगे?..' साहेब हडबडले. 'क्या गाली देता है यार!'



कोण हा 'ए. आर. रहेमान'? तामिळनाडूतल्या मद्रास (आता चेन्नई म्हणतात, बरं का?) येथील गुणी संगीतकार 'राजगोपाल कुलशेखरन' (आर. के. शेखर) (२१ जून, १९३३ - ०९ सप्टेंबर, १९७६) आणि कस्तुरी शेखर यांचा सुपुत्र 'ए. एस. दिलीपकुमार'! जन्म शुक्रवार, दि. ६ जानेवारी १९६७ चा. 'तामिळ मुदलीयार समाजात' जन्मलेले आर. के. शेखर हे एक उत्तम हार्मोनियम वादक आणि संगीत-संयोजक सुद्धा होते. त्यांचा विवाह 'कस्तुरी' नामक मुलीशी, तिरूपती येथील 'थिरूमाला व्यंकटेश्वर मंदिरात' संपन्न झाला होता. या दांपत्त्याला चार मुलं! आर. के. शेखर हे त्या काळातील बड्या-बड्या संगीतकारांना आपल्याकडील वाद्ये ध्वनिमुद्रणासाठी भाड्याने देण्याचा व्यवसाय करत असत. घरात संगीताचं वातावरण, आपल्या घरात सर्व प्रकारची वाद्ये उपलब्ध असल्यानेच की काय, या मुलाचा अगदी लहानपणापासूनच संगीताकडे ओढा होता. बालवयातच या पठ्ठ्याने हार्मोनियम, गिटार, पियानो आपलासा केला होता. रहेमान केवळ चारेक वर्षांचा असताना 'पियानो-की बोर्ड' शिकला होता. तो नंतर आपल्या वडिलांच्या स्टुडिओत संगीतासाथ सुद्धा करायचा. तो 'पद्म शेषाद्री बालभवन' इथे शिकत होता. सर्व काही व्यवस्थित चाललं होतं.. मात्र काळ कधीकधी किती क्रूर असतो पहा! दुदैवाने तो केवळ नऊ वर्षांचा असतानाच, अती परिश्रमांमुळे तब्येत बिघडून त्याच्या वडिलांचं अकाली निधन झालं. त्यामुळे त्याचं बालपण अक्षरशः कोमेजून गेलं. अचानक संपूर्ण कुटुंबाच्या उदरभरणाची जबाबदारी त्याच्यावर आली. तो नखशिखांत हादरला. मनाने अतिशय हळवा असल्यानेच की काय, काहीसा कोलमडून

गेला. वादक म्हणून मिळेल तिथे काम करत कुटुंबाच्या चरितार्थासाठी दोन पैसे मिळवावेत म्हणून जी तोड मेहनत करू लागला. यामुळे झालं काय! तर त्याच्या शाळेतल्या उपस्थितीवर परिणाम झाला. परिक्षांमध्ये नापास झाला. (हल्लीच म्हणजे २०१२ साली दिलेल्या मुलाखतीत त्याने अत्यंत दुःखद अंतःकरणाने सांगितलं होतं की.. माझी शाळेतली गैरहजेरी आणि माझ्या परिक्षांमधल्या अपयशामुळे त्याचे प्राचार्य, त्याच्या आईवर खूप चिडले होते. 'या महाभागाला शिक्षण कसलं देताय? 'कोदंबक्कम' मधल्या रस्त्यावर उभा करुन; भीक मागायला लावा.. याची तीच लायकी आहे!.. वगैरे वगैरे..!) मग काय? शालेय शिक्षण अर्धवट सोडून द्यावंच लागलं. पुढे 'एमसीएन' नामक शाळेत वर्षभर शिकला खरा, परंतु हाय! आयुष्य अंधःकारमय झालं होतं! आईचा त्याच्यावर मात्र खूप पगडा होता. आई म्हणजे त्याचं सर्वस्व! आपल्या पित्याच्या अकाली मृत्युपश्चात, तामिळ व मल्याळम चित्रपटात संगीत-संयोजन करणाऱ्या वडिलांमुळे परिचित झालेल्या वादक, संगीत संयोजक यांना आपल्याकडील वाद्ये भाड्याने देऊन ते पाच जणांचं कुटुंब आपला कसाबसा उदरनिर्वाह करू लागले होते. आर्थिक परिस्थिती मात्र खरोखरंच कठीण होती. याच काळात हे कुटुंब 'सुफी पीर - करिमुल्लाह शाह काद्री' यांच्या संपर्कात आलं, आणि त्या कुटुंबाशी त्यांचं जणू नातंच जुळलं. रहेमानची आई श्रीमती कस्तुरी, यांना हे 'सुफी पीर' आपल्या मुलीप्रमाणे मानत. त्यातच १९८४ च्या दरम्यान रहेमानच्या बहिणीला अचानक एक दुर्धर आजाराने ग्रस्त केले होते. श्रीमती कस्तुरी यांनी 'सुफी पीर - करिमुल्लाह शाह काद्री' यांच्याकडे नतमस्तक होत, नवस केला. सुदैवाने रहेमानची बहिण त्या आजारातून पूर्णतः बरी झाली. असं म्हणतात की, १९८६-८७ साली याच 'सुफी पीर' यांनी आपलेपणाने दिलेल्या सल्ल्यानुसार, तसेच काळाची पावलं ओळखून.. श्रीमती कस्तुरी यांनी आपल्या लेकरांसह 'इस्लाम धर्म' स्वीकारला. 'सुफी पीर' यांनी सुचविल्यानुसारच श्रीमती कस्तुरी यांनी 'करीमा बेगम' हे नाव स्वीकारलं तर मोठ्या लेकीचं नामकरण 'ए. आर. रेहाना' असं केलं. 'ए. एस. दिलीपकुमार' या आपल्या, एकुलत्या एक मुलाचं नामकरण करायचं होतं. 'अब्दुल रहेमान' किंवा 'अब्दुल रहीम' अशा दोन नावांपैकी कोणतंही नाव द्या, असं एका सुप्रसिद्ध हिंदू ज्योतिषाने, सुचवलं होतं, असं वाचनात आलं आहे! परंतु रहेमान यांनी आईच्या सल्ल्याने 'अल्ला रखा रहेमान' (ए. आर. रहेमान) हे नाव स्वीकारलं. धाकट्या दोन बहिणींची नामकरणे अनुक्रमे 'फातिमा रफीक' आणि 'इशरत काद्री' अशी करण्यात आली.

रहेमान जात्याच हुशार असल्याने त्याने नंतर जवळजवळ सर्वच वाद्यांवर हुकुमत मिळवली, हे विशेष! रहेमान याचं सुरुवातीचं संगीताचं शिक्षण 'मास्टर धनराज' यांच्याकडे सुरु झालं. वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी त्याची वर्णी लागली होती ती मल्याळम संगीतकार 'एम. के. अर्जुनन' यांच्या वाद्यवृंदात झाली. नंतर आपल्यातील अंगभूत कलागुणांमुळे, अनेक संगीतकारांकडे त्याची 'सिंथेसायझर' वादक म्हणून वर्णी लागली. 'एम. एस्. विश्वनाथन', 'विजय भास्कर', 'रमेश नायडू', 'विजय आनंद', 'गंगाराजू', 'राज-कोटी' ही त्यातली काही उल्लेखनीय नावे! दरम्यानच्या काळात 'ट्रिनिटी कॉलेज ऑफ म्युझिक (लंडन)' तर्फे त्याला 'शिष्यवृत्ती' बहाल करण्यात आली. पुढे संगीतातील त्याच्या याच उल्लेखनीय 'टॅलेंटमुळे' त्याला 'मद्रास ख्रिश्चन कॉलेज ऑफ हायर सेकंडरी स्कुल' मध्ये सन्मानाने ॲडमिशन मिळाली. इथे आपल्या बाल सवंगड्यांसोबत त्याने आपला 'रुटस्' नामक 'म्युझिक बँड' नावारूपाला आणला. सोबत कोण होते? तर त्याचे बालपणातले सवंगडी.. शिवमणी, सुरेश पिटर्स, कार्ल पिटर्स, कीथ पिटर्स, नवीन कुमार, जॉन ॲन्थनी! आपला रहेमान या ग्रुपमध्ये 'सिंथेसायझर' वाजवायचा बरं!! यानंतर तो 'सन्माननीय इलायाराजा' या सुप्रसिध्द संगीतकाराच्या कॅम्पमध्ये दाखल झाला. इलायाराजांच्या वाद्यवृंदात तो 'सिंथेसाईझर' वाजवायचा. (हा खरंतर रहेमानच्या आयुष्यातील 'टर्निंग-पॉईन्ट' होता.) सन्माननीय संगीतकार इलायाराजा यांच्याबद्दल सांगायचं तर हे दक्षिणेतले दिग्गज संगीतकार! आपल्या पं. हृदयनाथ मंगेशकर, सी.रामचंद्र, नौशाद, मदनमोहन, शंकर-जयकिशन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासह अनेक दिग्गजांच्या प्रतिभेला आपण जसे कुर्निसात करतो ना? तितकाच यांचा दक्षिणेत दबदबा! हे तर सिंफनीत गाजलेले संगीतकार! 'ट्रिनिटी कॉलेज ऑफ

म्युझिक (लंडन)' चे गोल्ड मेडलिस्ट.. असा यांचा नावलौकिक आणि दबदबा! ९०० भारतीय चित्रपट, सुमारे ४५०० सुपरहिट गाणी खात्यात असलेल्या सन्माननीय इलायाराजांच्या सानिध्यात रहेमान चांगलाच रूळला. स्वमेहनतीने संगीतातले अनेक नीरक्षीरविवेक शिकला. लक्षात घ्या! इलायाराजा साहेबांच्या संगीताची जातकुळी वेगळी आहे. 'मेलडी विथ ऑर्केस्ट्रेशन' अशी त्यांची स्टाईल सर्वश्रुतच आहे. रहेमानला इथेच मेलडी तसेच टेक्नो-म्युझिकचं बाळकडू मिळालं असावं असं मला तरी निश्चितच वाटतं. 'डिजिटल रेकॉर्डिंग कन्सोल' उपलब्ध होत आहेत म्हणता, १९९१ च्या दरम्यान त्याने गाणं रेकॉर्ड करणं सुरू केलं. याच वर्षी त्याने आपल्या घरामागच्या जागेत आपला स्वतःचा स्टुडिओ सुरु केला. ('पंचतन रेकॉर्ड इन'!) सुरुवातीला तो विविध 'माहितीपट' (डॉक्युमेंट्रीज) यांना संगीत/पार्श्वसंगीत देत असे. पुढे रहेमानला जाहिरातींच्या जिंगल्सचं काम सुद्धा मिळू लागलं. अनेक मोठ्या 'ब्रॅण्डस्' साठी त्याने जाहिरातीच्या 'जिंगल्स' बनविल्या आहेत. (काही उदाहरणं सांगायची तर.. 'ऑल्विन', 'टायटन-घड्याळे', 'लिओ कॉफी'.. वगैरे!) चौसष्ट कला असतात ना! तर 'जाहिरातींची जिंगल्स' ही पासष्टावी कला मानली जाते. वेगळंच प्रकरण आहे हे! जे सात-आठ मिनिटांच्या गाण्यातून साधता येत नाही ना! ते इथे अवघ्या तीस सेकंदात सांगणारी ही जाहिरातींची पासष्टावी कला आत्मसात होताच.. मग काय? रहेमानच्या कल्पकतेला आणखी वाव मिळाला! (सन्मा. अशोक पत्की साहेबांना सन्मानानं 'पासष्टाव्या कलेचे शहेनशाह' म्हणतात! तसंच आमचा जिव्हाळयाचा मित्र गायक-संगीतकार 'शंकर महादेवन' हा सुद्धा या कलेतला बादशाह आहे, हे इथे आवर्जून नमूद करावंसं वाटतं.)

दक्षिणेतील सुप्रसिध्द दिग्दर्शक मणिरत्नम! हे आपल्या चित्रपटाचं संगीत नेहमी.. आपलं व्यवस्थित 'ट्युनिंग' असलेल्या.. जिनियस इलायाराजा यांच्याकडूनच करायचे. सुपरस्टार रजनीकांत, मामुटी अभिनीत 'दलपति' (दि. ५ नोव्हेंबर, १९९१ राजी प्रदर्शित) या चित्रपटानंतर.. काही अपरिहार्य कारणामुळे ते नव्या संगीतकाराचा शोध घेऊ लागले होते. चेन्नईमध्ये जाहिरातीतील कल्पकतेला गौरवणाऱ्या एका सोहळ्यात अग्रभागी होता, तो आपला ए. आर. रहेमान! 'लिओ कॉफी'च्या जाहिरातीतल्या जिंगलच्या अभूतपूर्व यशाबद्दल त्याला सन्मान देण्यात आला होता. याच सोहळ्यात शरद त्रिलोक या त्याच्या दूरच्या नातेवाईकाने ए. आर. रहेमानची.. मणिरत्नम साहेबांबरोबर ओळख करून दिली. मात्र कामाच्या व्यापामुळे त्यांची लागलीच गाठभेट नाही होऊ शकली. परंतु.. काही दिवसांनंतर, म्हणजे १९९२ च्या अगदी सुरुवातीला, जेव्हा मणिरत्नम, रहेमानच्या स्टुडिओत आले तेव्हा तिथे काम करणाऱ्या रहेमानला पाहताक्षणी स्तिमित झाले! चोवीस-पंचवीस वर्षे वयाच्या त्या मुलाचं ज्ञान, सादरीकरण, संगीत-नियोजन, कामाचा आवाका पाहताच त्यांनी तत्क्षणी त्याला आपल्या पुढील चित्रपटासाठी साईन केलं. दुदैवाने मणिरत्नमच्या या तथाकथित सिनेमानं पडदा पाहिला नाही पण त्यांनी के. बालचंदरजी या आपल्या मित्राबरोबर निर्माण करत असलेल्या चित्रपटात त्याला संधी दिली. तो चित्रपट होता अरविंद स्वामी-मधू अभिनित 'रोजा' (भाषा : तामिळ व हिंदी, १५ ऑगस्ट, १९९२ रोजी प्रदर्शित.) तामिळ भाषेत हा सिनेमा चांगलाच गाजला! 'आयफा' पुरस्कार मिळालाच, वर तीन 'नॅशनल ॲवॉर्डस्' सुद्धा घेऊन गेला, या चित्रपटाचा 'बेस्ट फिल्म ऑन नॅशनल इंटिग्रेशन' (राष्ट्रीय एकात्मता) असा सन्मान झाला. तसेच रशियात साजरा होणाऱ्या अठराव्या 'मॉस्को इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' मध्ये नामांकनाचा सन्माननीय मानकरी ठरला. तो मूळ तामिळ भाषेत नेमका किती हिट झाला हे.. भाषेचा अडसर असल्याने माहीत नाही परंतु त्याची गाणी मात्र रसिकांना अतिशय आवडली होती. त्याने 'फिल्मफेअरसह' अनेक पारितोषिकं पटकावली, हे मात्र नक्की! हा सिनेमा पुढे लगेचच हिन्दीत डब होऊन सामोरा आला. संवादांचं डबिंग सुमार होतं म्हणा, पण गाणी उल्लेखनीय होती. 'रोजा'च्या या गाण्यांचा अनुवाद केला होता गीतकार पी.के. मिश्राजींनी! 'रुक्मिणी रुक्मिणी ..' (बाबा सहेगल-श्वेता), 'छोटी सी आशा..' (मिन्मिनी), 'भारत हम को जान से प्यारा..' (हरिहरन), 'रोजा जानेमन..' (हरिहरन) ही गाणी लोकांनी डोक्यावर घेतली होती. गीतकार पी.के. मिश्राजींनी अनेक जागी पाटया टाकल्या आहेत, पण लोकांना ती आवडली व ती गाणी आजही हिट आहेत. एक आठवतंय! या काळात 'सीडीज, व्हीसीडी, डिव्हिडी' याचं मार्केट अतिशय फार्मात

होतं. संदर्भ म्हणून सांगायचं तर 'फिल्मफेअर- नॉमिनेशन्स' ही एकमेव फुटपट्टी वापरलीत आणि ती यादी व्यवस्थित अभ्यासलीत तर.. त्या काळात कोणकोणत्या चित्रपटातील गाणी 'सुपर-हिट' होती? कोणती गाणी गाजत किंवा वाजत होती? हे सहजच लक्षात येईल. जानेवारी ते डिसेंबर १९९२ या काळात अनेक हिंदी चित्रपट प्रदर्शित झाले. 'खिलाडी', 'जो जिता वोही सिकंदर', 'बेटा', 'मुस्कुराहट', 'राजू, बन गया जंटलमन', 'खेल', 'शोला और शबनम', 'बेटा', 'दीवाना', 'अंगार', 'खुदा गवाह', 'कसक' अशी अनेक नावे दृग्गोचर होतील. त्यातली गाणी वाजत होती, गाजत होती. सगळंच मस्त चाललेलं यार!. पण.. आपल्या सर्वांच्याच दुदैवाने दिं, ६ डिसेंबर, १९९२ रोजी.. त्या 'बाबरी मस्जिद' पतनानंतर सगळं काही ढवळून निघालं होतं. लगेचच मुंबईत जातीय दंगली उसळल्या. घराबाहेर पडणंही कठीण झालं होतं. यातून आपण काहीसे सावरतोय न सावरतोय तोच १२ मार्च, १९९३ च्या बॉम्बस्फोटांनी तर आपली 'मुंबई' जणू छिन्नविच्छिन्न झाली. आपलं दैनंदिन सुखी, समृद्ध जीवन तर पूर्णतः ढवळून निघालंच.. वर.. आपल्या संगीत क्षेत्रावर अतिशय वाईट परिणाम झाला. ती घटनाच एवढी विदारक होती की २४ मार्चच्या गुढीपाडव्यापासून पुढे गणेशोत्सव व नंतर नवरात्रोत्सव, दिवाळीपर्यंत उत्साहात साजऱ्या होणाऱ्या आपल्या सर्व सण आणि उत्सवावर खिन्नतेचं सावट होतं. जानेवारी, १९९३ या महिन्यात चिक्कार सिनेमे प्रदर्शित झाले होते खरे, पण जातीय दंगलींमुळे व नंतरच्या बॉम्बस्फोटांमुळे सिनेमा थिएटर्सकडे वळण्यास कुणीच तयार नव्हतं. दहशत होती! अनेक चित्रपटातील गाण्यांच्या 'कॅसेटस्' मार्केटमध्ये उपलब्ध होत्या, परंतु त्या भयंकर काळात सिनेमातली गाणी ऐकण्याच्या मनःस्थितीत कुणीच नसायचं. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात दिग्दर्शक 'जे.पी.दत्ता' यांनी हिम्मत करून, तगडी स्टारकास्ट असलेला, 'क्षत्रिय' प्रदर्शित केला, पण हाय! कुणीच त्याची साधी दखल सुद्धा घेतली नाही. (१९९४ साली '३९व्या फिल्मफेअरच्या' सोहळ्यात तर तो कुठेही नव्हता.) मला आठवतंय, एप्रिल व मे, १९९३ नंतर परिस्थिती काहीशी निवळू लागली.. कारण.. हातावर पोट असणारे आपला कामधंदा, नोकरी सोडून.. घरी थोडेच बसू शकणार होते!?

'रोजा' (तामिळ), 'योद्धा' (मल्याळम) या चित्रपटानंतर आला तो के.टी. कुंजुमन निर्मित, एस शंकर दिग्दर्शित (अर्जुन-मधुबाला-प्रभुदेवा अभिनित) तामिळ भाषेतला 'जंटलमन'! (१५ जुलै १९९३). 'चिक्कू बुक्कू रईले..' या गाण्यासह सगळीच गाणी सुपरहिट! 'फिल्मफेअर' ही मिळालं. याच चित्रपटाचा रीमेक हिन्दीतही आला. (१८ नोव्हेंबर, १९९४!) अल्लू अरविंदने त्याची निर्मिती केली होती. महेश भट यांच्या दिग्दर्शनात कलावंत होते चिरंजिवी-जुही चावला! कथालेखकाचा आग्रह होता म्हणून मूळ तामिळ चित्रपटातील रहेमानची तीन गाणी, सुयोग्य होती म्हणून तीच ठेवणं अपरिहार्य होतं. त्या चालीत जान होती. पण वाट्टेल ते शब्द कोंबून ती 'डब' करणं महेश भट यांना प्रशस्त वाटलं नाही. कारण आधीच्या 'गीतकार' म्हणून घोंगडं पांघरणाऱ्या शर्विलकांनी गाण्यातील संकल्पनेचे तीन तेरा वाजवले होते, ही गोष्ट महेश भट जाणून होते. त्यांनी संगीतकार अनु मलिककडे शब्द टाकला. अनु मलिक तर असल्या कामात तर माहीर होतेच! त्यांनी ते काम अगदी लिलया पेललं. अनू मलिकने संगीतकार ए. आर. रहेमान यांच्याच सुरावटींशी इमान राखत तीन गाण्यांचं सादरीकरण केलंय. या सुरावटींवर गीतकार इंदिवरजींनी अतिशय सुंदर असं काव्य लिहिलं होतं. 'रूप सुहाना लगता है, चाँद पुराना लगता है..'!. हे सर्वांगसुंदर गाणं हे याचंच फलित. या चित्रपटात अनु मलिकने केवळ दोन गाणी कंपोज केली होती. परंतु 'कॅसेटस् व सीडीजच्या' इन्ले-कार्डवर संगीतकार म्हणून अनु मलिकचं नाव आहे. सिनेमाच्या श्रेयनामावलीत ए. आर. रहेमानचं नाव दिलं आहे! धन्य हो!

'रोजा' ते 'काधलन' या काळात रहेमानचे बरेच चित्रपट आले. मात्र वाचतानाच आपली दमछाक होईल अशा त्या टायटल्स आहेत! (यातले काही चित्रपट हिन्दीत 'डब' होऊन आले होते. कंसात दिलेली नावे ही 'हिन्दी डब किंवा रीमेक झालेल्या सिनेमांची' आहेत.) १९९३-९४ साली प्रसिध्द झालेल्या 'योद्धा' (धरम योद्धा), 'पुधिया मुगम'

(विश्वविधाता), 'थिरूडा थिरूडा', 'जंटलमन', 'सज्जन', 'किजहक्कू चीमायिले', 'उझावन', 'वंदीचोलाई चिनरासू', 'ड्युएट', 'मई मदम', 'पवित्र', 'पिधिया मन्नारगल', 'करूथम्मा', 'काधलन' (हे तामिळ) तसेच 'सुपर पोलिस',



'गँग-मास्टर' (तेलुगू) आणि 'योध्दा' (मल्याळम) अशा अनेक चित्रपटाच्या संगीतात काही तरी खास बात नक्कीच असावी! म्हणूनच की काय, आपल्या ऱ्हिदम-प्रोग्रामिंगसाठी नवे लूप्स, सॅम्पलर्स मिळतील या आशेने, आमच्या म्युझिक-इन्डस्ट्रीतले म्युझिक-प्रोग्रामिंग करणारे वादक, मांटुंगा विभागात रेंगाळताना दिसायचे. भाषा ओ की ठो कळत नव्हती.. पण पर्वा इल्ले! 'मुक्काला मुक्काला..' (तामिळ चित्रपट 'कादलन') हे गाणं येताच आता मात्र संगीतकार ए. आर. रहेमानचं नाव अधोरेखीत झालं. रहेमानच्या गाण्यांची स्टाईलच अजब होती. पारंपरिक संगीत-नियोजनाला छेद देणारी. त्याच्या गाण्यांच्या चाली, ऱ्हिदमचा तो वैशिष्ट्यपूर्ण ठेका, आणि संगीत संयोजनात सतार-सरोद-संतूर-हार्मोनियम अशा तद्दन भारतीय वाद्यांचा औचित्यपूर्ण केलेला वापर ऐकून थक्क झालेले सारे. रहेमानचं फ्युजन आणि आपल्या संगीतकारांचं कन्फ्युजन! ऱ्हिदम, गायकाचा स्वर आणि संगीत याचं मिक्सिंग करताना त्याने वापरलेलं तंत्र वेगळंच होतं. थक्क करणारं होतं! याच मार्केटमधून कुणकुण लागली होती की, मणिरत्नम यांच्या 'बॉम्बे' (१० मार्च, १९९५ रोजी प्रदर्शित) या नव्या सिनेमाची गाणी लवकरच मार्केटला येणार आहेत. हा सिनेमा.. एक मुस्लिम तरूणी व हिंदू तरूण यांची प्रेमकहाणी आहे, तसंच त्यात मुंबईतील जातीय दंगलींची सुद्धा पार्श्वभूमी आहे, अशी दबक्या आवाजात चर्चा होती. मणिरत्नम आणि ए. आर. रहेमान यांच्या 'रोजा' व 'थिरूडा थिरूडा' नंतरचं एकत्रित असं हे तिसरं सादरीकरण. तुम्हाला ठाऊकच असेल, या काळात मुंबईत कॅसेटस्‌ची सॉलिड पायरसी चाले. एकेकाळी (१९८४ ते...) ग्रॅन्टरोडचा गल्लीबोळ पायरसी कॅसेटस्‌च्या स्टॉल्सनी ओसंडून वाहायचा. (बडी धेंडं होती त्यामागे असं म्हणतात.) १९९४ च्या जानेवारीत 'बॉम्बे'ची गाणी ज्या दिवशी रिलिज झाली त्या दिवशी, मी आमच्या 'व्हीनस' कंपनीच्या 'पॅनासोनिक पुरस्कृत' लाईव्ह-शोच्या निमित्ताने दिल्लीत मुक्कामाला होतो. शहराच्या मुख्य बाजारातल्या एका दुकानदाराने 'कादलन' या तामिळ चित्रपटातलं 'मुक्काला..' गाजलंय म्हणजे या 'बॉम्बे'ची सुद्धा पायरसी होणारच असं छातीठोकपणे सांगितलेलं. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वरच्या खोक्यांच्या थरात 'एचएमव्ही'चा ओरिजिनल माल, तर खालच्या खोक्यांमध्ये पायरेटेड कॅसेटस्‌चा डुप्लिकेट माल अक्षरशः ट्रक भरभरून येतच असतो. किती म्हणून नियंत्रण करणार? कधीकधी तो पकडलाही जातो पण कुठल्याही हिट टायटलची, पायरसी होतेच होते असं

सांगितलं. मात्र यावेळी 'पॉलिग्राम म्युझिक कंपनीने' जबरदस्त फिल्डींग लावल्याचं दिसलं. पायरेटेड कॅसेटचा माल पकडल्याचंही दुसऱ्याच दिवशी पेपरातून कळलं. मला कमाल वाटली! साऊथच्या गाण्याशी यांचा काय संबंध? मला राहवेना.. 'भाईसाब एक बात बताईए.. क्या समझता है आपको, इन एन्डू-गुन्डू गानों में?' माझा भाबडा सवाल. 'मायकेल जॅक्सन के गाने क्या खाक समझते है? फिर भी हमारे बच्चे उसपर नाचते है ना? देखो भाई.. ए. आर. रहेमान तो अपना देसी है.. उसका म्युझिक तो लाजवाब है.. यहाँ का बच्चा-बच्चा उसका फैन हो चुका है, इस में कोई शक?...' आश्चर्य वाटलं! कुठे मद्रास? कुठे दिल्ली!? रहेमानची गाणी इथेही हिट? कन्याकुमारी टू काश्मिर? प्रेम आणि संगीताला भाषा-देश-जात-धर्म-प्रांताच्या सीमा नसतात हेच खरं. याच चित्रपटानंतर संगीतकार ए. आर. रहेमान या नावाला वलय प्राप्त झालं. कुणी काहीही म्हणा! 'बॉम्बे' (१० मार्च, १९९५ रोजी प्रदर्शित.)च्या 'कुची-कुची रकम्मा..'(उदित-कविता-जीव्ही प्रसाद-शारदा), 'हम्मा हम्मा हम्मा..' (आपला गोवेकर रेमो फर्नांडिस), 'कहनाही क्या..' (चित्रा), 'तूही रे..' (हरिहरन-कविता) अशा गाण्यांनी बऱ्याच जणांच्या दुःखावर फुंकर घालण्याचं किंवा ते थोडंसं हलकं करण्याचं काम केलं असेल, असं निदान मला तरी वाटतं. 'बॉम्बे' (१९९४)ची गाणी ही डब केलेली असूनही त्यात जबरदस्त झिंग होती. रहेमानचं सादरीकरण तर जबरदस्त होतं. या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळीच बराच वादंग झाला होता. आंतर-धर्मीय प्रेमकहाणी असल्याने गजहब होईल अशी शंका उपस्थित केली गेली होती. सिंगापोर, मलेशिया इथे तर या चित्रपटावर बंदी आणण्यात आली होती. तर.. मणिरत्नम यांच्या घरावर तर दोन गावठी बॉम्बचा मारा करण्यात आला होता आणि यात ते जखमी झाल्याने, त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागलं होतं, हे वाचनात आलं होतं. मात्र हा सिनेमा हिंदी भाषेमध्ये प्रदर्शित होताच चांगलाच गाजला. अनेक पारितोषिकांचा मानकरी ठरला, हे विशेष! पुढे ६ ऑगस्ट, १९९६ रोजी या चित्रपटाला 'राष्ट्रीय एकात्मता' असा सन्मान करत 'राष्ट्रीय पुरस्कार' देण्यात आला.





दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांचा 'रंगीला' (८ सप्टेंबर, १९९५ रोजी प्रदर्शित) हा हिन्दी चित्रपट येईपर्यंत 'ए. आर. रहेमान' हे नाव सर्वतोमुखी झालं होतं, पण ते त्याच्या साऊथच्या चित्रपटातील योगदानामुळे. रहेमान तोपर्यंत, त्या शिदोरीवर चक्क अनेक राष्ट्रीय, राज्य, अकादमी, फिल्मफेअर, एमटीव्ही पुरस्कारांचा धनी झाला होता. 'रंगीला' हा त्याचा हिंदी भाषेतील पहिलाच चित्रपट! रविवार् दि. १४ मे, १९९५ रोजी रहेमानच्या आईच्या हस्ते त्या अल्बमचं दिमाखात प्रकाशन झालं. ए. आर. रहेमान या गुणी संगीतकाराच्या प्रतिभेला आशाताईंच्या गाण्यांनी चार चाँद लावले. हरिहरन, सुरेश वाडकर, उदित नारायण, कविता कृष्णमूर्ती, चित्रा, श्वेता शेट्टी, स्वर्णलता अशा गायकांची गाणी रसिकांना मनोमन आवडली. १९९५च्या फिल्मफेअर सोहळ्यात ए. आर. रहेमानला, आर. डी. बर्मनजींच्या नावानं देण्यात येणाऱ्या पुरस्काराने गौरविण्यात आलं. आता मात्र या इंडस्ट्रीला त्याची दखल घ्यावीच लागली. त्याच्या

दारासमोर बऱ्याच हिन्दी चित्रपट निर्मात्यांनी रांगा लावल्या. हिंदी चित्रपट संगीतात म्युझिक-अरेंजमेंटमध्ये काहीही उछलकूद केली, झोल-झाल केली तरी चालते, पण शेवटी इथे काव्यरचनेला फार महत्व आहे, शब्दप्रधान गायकी आणि आशयसंपन्न गाणीच रसिकांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य करतात हे त्याला पक्कं ठाऊक होतं. पण भाषा? हिंदीत काम करायचं म्हणता त्याचे वांधे होणार होते. भाषेची अडचण तर होतीच होती. हिन्दीत डब झालेल्या त्याच्या साऊथ-इंडियन डिश, केवळ 'ऱ्हिदम व म्युझिक' चागलं आहे, म्हणून रसिकांनी चवीनं आडवा हात मारून ओरपल्या खऱ्या, पण अजीर्ण झालं तर? एका भाषेतली गाणी दुसऱ्या भाषेत डब केल्याने त्यातला आत्मा हरवतो ही वस्तुस्थिती लक्षात आली होतीच. आधी पी. के. मिश्रा व नंतर महबूब! तामिळ ते हिंदी अनुवादाने आपल्या चांगल्या गाण्यांची वाट लावतेय, हे त्याला कळलं होतं. हिन्दी गाण्यांसाठी अशा गीतकारांवर अवलंबून राहिलो तर ते जुगार खेळल्यासारखं होईल. मानवी भाव-भावनांचा लवलेश नसलेले शब्द कोंबून गाणी लिहिणाऱ्या अशा असंगाशी संग नको, म्हणून त्याने निर्णय घेतला. गीतकार बदलले. जिनियस गुलजारजी, जावेद अख्तरजी यांच्याशी संपर्क साधला. नंतर समीर, राहत इंदौरी, प्रसून जोशी संपर्कात आले. रहेमानचा शायर/गीतकारांबद्दलचा हा निर्णय किती महत्वाचा होता हे तुम्हीच पहा!

संगीत आकाराला येणं, ही तर प्रदीर्घ प्रक्रिया असते. रहेमानने या परंपरेलाच सुरुंग लावला. कसा? थेट १९५२ ते ९२ या चार दशकात एखाद्या चित्रपटातील गाणं रेकॉर्ड करायचं असेल, तेव्हां नेमकं काय व्हायचं? संगीतकाराची निवड झाली की निर्माता-लेखक-निर्देशक-गीतकार वगैरे मंडळी संगीतकारांच्या म्युझिक रूमवर गोळा व्हायचे. लेखक-निर्देशक, आधी स्टोरी-सीटिंग्ज करायचे किंवा चार ओळीत कथानक ऐकवायचे. गाणी कुठल्या 'सिच्युएशनवर' टाकायची ते सर्वानुमते ठरवलं जायचं. मग संगीतकार त्या 'सिच्युएशनला' साजेशा धुना ऐकवायचे. धून पसंत पडली की त्यावर संगीतकार आपल्या 'सीटिंग-मेंबर्स' बरोबर मेहनत करून गाणं आकाराला आणायचे. नंतर ते 'बाळ' गीतकाराकडे, त्या मापाचं झबलं शिवायला, सोपवलं जायचं. ते त्या चालीत शब्द कोंबून गाणी तयार करायचे. मग काय! दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी स्टुडिओ बुक करून वादक, गायक यांना पाचारण केलं जात असे. एक किंवा दोन दिवसात काम फत्ते! या गाण्यांमध्ये जास्तीत जास्त भराणा असायचा तो 'ॲनालॉग' वाद्यांचा. म्हणजे 'हार्मोनियम', सुमारे चाळीसेक 'व्हायोलिन्सचा ताफा', 'ॲकॉर्डियन' अशा वाद्यांचा.

'ए. आर. रहेमान' लाईम-लाईटमध्ये येण्याआधी, हिंदी गाण्यांमध्ये 'इलेक्ट्रॉनिक ऱ्हिदम' नव्हताच असं नाही. सत्तरच्या दशकात, लाऊड-स्पीकरवाले 'कम सप्टेंबर' ची ईपी रेकॉर्ड वाजवायचे, त्यावर आम्ही मुलं..'रेकॉर्ड-डान्स' करत असू. त्यात 'गिटार' वगळता 'इलेक्ट्रॉनिक वाद्ये' नव्हती. संगीत होतं 'बॉबी डेरेन' यांचं! (मूळ रेकॉर्ड १९६१) या गाण्यामध्ये 'ॲकॉस्टिक ड्रम्सचा' वापर केलेला आहे नंतर १९७४ च्या आसपास 'पोलार्ड-सिनड्रम' नामक 'इलेक्ट्रॉनिक ड्रूलसेट' संगीतक्षेत्रात आला. डान्स प्रकारातील 'बॅले', 'ट्विस्ट' ते 'वॉल्टज्', 'चाचाचा' असे अनेक प्रकार आपण जाणतो. पण मग 'डिस्को' आणण्याचं श्रेय कुणाला द्यायचं? 'संगीतकार बिद्दू' यांना सन्मानाने 'डिस्कोचा पायोनियर' म्हटलं जातं. १७ ऑगस्ट, १९७४ रोजी 'बिद्दू'च्या संगीतातलं 'कुंग फू फायटिंग..' (गायक : कार्ल डगल्स) प्रकाशित झालं आणि खूप खूप गाजलं. हे खरंखुरं पहिलं 'डिस्को'! निर्माता/दिग्दर्शक फिरोज खानच्या 'कुर्बानी' (१९८०) चे संगीतकार होते 'कल्याणजी-आनंदजी'! सहायक संगीतकार म्हणून जिनियस 'बाबला' होता. सर्व गाणी झकास जमून आलेली पण त्यांचं मन गुंतलं होतं 'कुंग फू फायटिंग..' या गाण्यात! त्यांनी प्रस्ताव दिला, परंतु 'कल्याणजी-आनंदजी' यांनी, ते गाणं आपण 'बिद्दू' कडूनच करून घेऊया असं सांगितलं. मग काय, 'बिद्दू' ने त्याच 'पॅटर्न' मधलं, वेगळं 'कंपोजिशन' बनवलं. गीतकार इंदिवरजींनी गाणं लिहिलं. 'बात बन जाए..' हे गाणं 'नाजिया हसन' या पाकिस्तानी गायिकेने गायलं. हेच आपलं परदेशात रेकॉर्ड झालेलं, परंतु पहिलं हिंदी 'डिस्को'! पुढे आपल्याकडे तो 'इलेक्ट्रॉनिक ड्रूलसेट', 'रोटो-ड्रम्स' सर्रास वापरले जाऊ लागले. याचा मस्त वापर केला असेल तो

'बाबला'नेच. स्व. इंदिराजींनी त्याला सन्मानाने 'ऱ्हिदम-किंग' अशी उपाधी दिली होती! अशा दिग्गजांमुळे गाण्यातले 'ऱ्हिदम-पॅटर्नच' बदलून गेले. मात्र आधी हिंदी गाण्यांमध्ये तो फक्त 'बेस-किक्स, स्नेअर' लाईव्ह पद्धतीने वाजवण्यासाठी वापरला जात असे. पंचमदांच्या संगीतातलं 'शालिमार' (१९७८) मधलं 'वन, टू, चाचाचा..' (गायिका : उषा उत्थुप) आठवा! ते 'चाचाचा' या डान्स प्रकारातलं आहे. त्यात तो आहे! 'केरसी लॉर्ड' हे संयोजक होते. (आपला 'रहेमान' तेव्हां, फक्त अकरा वर्षांचा होता पण 'की-बोर्डचं' वादन करता करता त्यांने ही सगळी स्थित्यंतरं नक्कीच अभ्यासली असणार.) 'डिस्को'चे इंग्रजीत अनेक अल्बम्स आले होते, ते चिक्कार गाजले होते! (यातल्या चाली चोरल्याही गेल्या!) मग हिंदी चित्रपट संगीतातलं पहिलं 'प्युअर' भारतीय 'डिस्को' गाणं कोणतं? तर भप्पीदांच्या संगीतातलं 'मौसम है गाने का..' (सुरक्षा १९७९)! संगीत संयोजक : 'अनिल-अरुण'! तर 'ताबून'ने त्या गाण्यात नव्यानेव आलेले 'इलेक्ट्रॉनिक ड्रम्स' लाईव्ह वाजवून, ऱ्हिदम कंपोज केला होता. नंतर आलं 'हाँ मेरे जैसे हसिना का..' (शेरॉन प्रभाकर-'अरमान'-१९८१)! मग काय? नंतर 'डिस्को' गाण्यांची तर लाटच आली. हेच 'इलेक्ट्रॉनिक ड्रूलसेट, रोटो-ड्रम्स' वापर करून 'बाबला'ने १९८१-८२ मध्ये 'डिस्को-दांडिया' आणला, आणि धमाल झाली!

१९८२ साली 'रोलॅण्ड' या मातब्बर कंपनीचा बेसिक ॲनालॉग श्रेणीतील 'ज्युनो-६०' हा 'सिंथेसायझर' उपलब्ध झाला. (१९८२ मध्ये मी, आमच्या 'लाला कॉलेज' मधल्या एका सांगीतिक कार्यक्रमात तो पाहिला. कुतुहल असल्याने तो वाजवूनही पाहिला. थक्क झालेलो!) नंतर चित्रपटांच्या गाण्यांमध्ये अनेकदा हा 'सिंथेसायझर-की-बोर्ड' वापरला जायचा पण तो फक्त आपल्या जेवणातल्या लोणची-पापडा इतकाच! १९८५ मध्ये याच 'रोलॅण्ड' कंपनीचा 'ऑक्टापॅड' अगदी वाजतगाजत आला. हा 'ड्रम-सेट' वाजवतात त्या 'स्टिक्सने' वाजवला जाणारा 'इलेक्ट्रानिक-ड्रम' होता. याचं आमच्या 'म्युझिक इंडस्ट्रीमध्ये' कसं स्वागत झालंय, माहित्येय? अगदी 'राम जन्मला गं सखी राम जन्मला..' अशा मानसिकतेतल्या शुद्ध भावनेतून! अगदी आनंदी असा माहौल निर्माण झालेला! अनेक नामचिन ऱ्हिदम वादकांनी, हे नवीन ऱ्हिदम-मशिन आपल्या संग्रहात हवं म्हणून पदरमोड करून तो विकतही घेतला होता. परंतु तो कसा वापरायचा, याचं तितकसं ज्ञान मात्र नव्हतं. गंमत म्हणजे.. हा 'ऑक्टापॅड' जेव्हा प्रचलित झाला, त्याचा पहिला वापर कुणी केला असेल? तर पाकिस्तानी पॉप-सिंगर 'हसन जहांगीर' याने! 'ओ माय गॉड'!.. तेही, 'हवा हवा.. खुशबू लुटा दे..' व्यवस्थित प्लॅन करून आणल्या गेलेल्या, एका 'अल्बम' मध्ये! तो 'जबरदस्त' काळ आठवतोय ना! ते खरंतर ओरिजिनल कंपोझिशन नव्हतंच. १९७० सालच्या 'हवर हवर..' या 'पर्शियन' (गायक : शौरोश यग्मई) गाण्यावरून 'शायर मोहम्मद नासिर' यांनी ते गाणं लिहिलं होतं. 'हसन जहांगीर' याने मात्र त्याची झकास पेशकश केली होती. आपल्या इथल्या, 'म्युझिक कंपनीने' पाकिस्तानातील एखाद्या 'अल्बम'चे हक्क विकत घेत प्रकाशित करणं हे त्या काळात सुद्धा अवघड होतं. (तुम्हाला ठाऊक अहे ना! आपली एच.एम.व्ही. 'गुलाम अली', 'मेहदी हसन' यांचे अल्बम्स् , त्यांच्या 'इ.एम.आय.' या आंतरराष्ट्रीय लेबलवर प्रकाशित करत असे! परंतु त्यांनी 'हसन जहांगीर'चा हा अल्नम, त्या प्रकारे मार्केटमध्ये आणलाच नाही. कारण.. त्यांनाच ठाऊक!) तर 'हसन जहांगीर'चा हा अल्बम जून, १९८७ मध्ये दुबई देशांतून 'सोनी कंपनीच्या, ब्लँक-कॅसेटस्'वर (अक्षरशः 'पायरेटेड-कॅसेट' स्वरूपात) इथे दाखल झाला. अगदी 'हॉट-केक' सारखा विकला गेला. तुम्ही पाहिलं असेल! पुण्यातल्या एखाद्या 'मोटर स्पेअर-पार्टस्' च्या दुकानात, उद्याच्या 'संकष्टी' निमित्ते 'उकडीचे मोदक मिळतील..' अशी पाटी पाहून आपणं थक्क होतो ना! तर संपूर्ण महाराष्ट्रातील हाय-वे वरच्या.. 'मोटर स्पेअर-पार्टस्'च्या दुकाना बाहेर, तिथल्या 'पान-टपरीवर', धम्माल 'कॅसेट-विक्री' सुरू झाली! 'हवा हवा..' फिव्हर! पण मग हे 'स्मगलिंग' नक्की कुणी केलं? खरं सांगायचं तर.. आपले टिपिकल कोकणी मुसलमान लोक, नोकरीच्या निमित्ताने 'दुबई, अबु धाबी, कतार' अशा ठिकाणी गेले होते ना! ते १९७५ पासून 'सोनी/हिताची' वगैरे कंपन्यांच्या ६० व ९० मिनिटांच्या 'ब्लँक' कॅसेटसचे 'बॉक्स' स्व-वापरासाठी, 'ऑफिशिअली' बिनधास्त आणत असत. (शेवटी ते आडमार्गाने 'स्मगलिंगच' होतं हो! पण अधोरेखित केलं गेलं

नव्हतं!) या 'ब्लँक इंपोर्टेड- कॅसेटस्' व्ही.टी. ते थेट हुतात्मा चौक इथल्या सलग फुटपाथवर, केरळी/मद्रासी लोकांच्या स्टॉलवर स्वस्त दरात उपलब्ध असत. 'स्मगलिंग' केलेल्या 'परफ्युम्स' वगैरे अनेक गोष्टींबरोबर या 'कॅसेटस्', अगदी उजळ माथ्याने सर्रास विकल्या जात. तर 'हवा हवा..' हा अल्बम 'चुपके चुपके' भारतात आला. त्या 'कॅसेटस्' वर, त्या अल्बमविषयी संपूर्ण माहिती हवी होती की नाही!? पण त्यावर 'ऑल-क्रेडिटस्' देणारं 'इन्ले-कार्ड' नव्हतं. गायक कलावंताचा फोटो नव्हता. मात्र  इथल्या सर्वच्या सर्व कॅसेट-कंपन्यांनी, सोन्याचं अंडं देणारी कोंबडी सापडल्यागत, आपल्या १९५७ च्या 'इंडियन कॉपिराईट ॲक्ट'ला फाटयावर मारून 'बाप का माल' म्हणून विकला. हा अल्बम सिंगापूरहून आयात केलेल्या 'अन्-ब्रॅण्डेड' ब्लँक कॅसेटस्वर 'रेकॉर्ड' करून विकला जात असे. (होलसेल रेट? रू. ९/-, तर एम.आर.पी. रू. १८/-) आपला वीस वर्षे वयाचा 'ए. आर. रहेमान', त्याच्या लहानपणापासून ही सगळी स्थित्यंतरं शांतपणे अभ्यासत असावा, यात शंकाच नाही! तर नवा 'ऑक्टापॅड' आणि त्याचं ते सादरीकरण पाहून 'डिस्को-सेन्शेशन' म्हणजे नेमकं काय हे वादकांना हळुहळू लक्षात लक्षात येऊ लागलं होतं. वादनाबाबत मात्र 'कन्फ्युजन' होतं. ('हवा हवा..' हे गाणं इतकं गाजत होतं की, ते संजय दत्त, फराह अभिनित 'इन्साफ अपने लहू से' (मार्च, १९९४) मध्ये बिनधास्त वापरलेलं दिसलं. श्रेयनामावलीत गीतकार म्हणून 'समीर' आणि संगीतकार म्हणून 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' ही नावं वाचून थक्क झालो बुवा!) संगीतक्षेत्रात नव-नवी 'इलेक्टॉनिक-वाद्ये' येण्याचा सिलसिला सुरू होता, मात्र अजुनही  गाण्याचं प्रोग्रॅमिंग करणं तर दूरच होतं. त्या सिंथेसायझरवर एखादं संपूर्ण गाणं आकाराला येऊ शकतं, ही संकल्पना तर या (व आधीच्या) काळात तर अगदी कुणाच्याही अजिबात पचनी पडणारी नव्हती. नवं तंत्रज्ञान विकसित होताच, १९८५च्या आसपास आणखी अद्ययावत 'सिंथेसायझर्स' आले. आता यात 'मिडी' नामक तंत्रज्ञान आलं होतं. 'फ्लॉपी-डिस्क, सीडी रॉम' टाकून, विविध ट्रॅक्स् 'सेव्ह' करण्याची सुविधा आली होती. त्यात भर म्हणून की काय.. 'रोलॅण्ड' कंपनीचा 'ऑक्टापॅड' आला होताच, परंतु हे 'इलेक्टॉनिक-ड्रम-मशिन' नवखं असल्याने ते केवळ 'किक्स व स्नेअर'च्या वादनासाठी वापरलं जात असे. उत्सवात सादर होणाऱ्या 'ऑर्केस्ट्रात' तर तो केवळ 'ढिन-चॅक' वादनाएवढाच वापरला जाई. तर गाण्यातला 'ऱ्हिदम' हा फक्त तबला/ ढोलक, बोंगो/कोंगो ते ड्रम-सेट यांच्या वाद्यमेळाच्या वादनातूनच घेतला जाई. व्हायोलिन्सचा ताफा, बासरी, सतार, वीणा, सरोद, मेंडोलिन, गिटार, ट्रम्पेट, बासरी वगैरे वाद्ये तसेच सिंथेसायझर वर वाजवले गेलेले काही पीसेस, त्या त्या वादकाच्या 'लाईव्ह' वादनातूनच रेकॉर्ड केल्या जात. (हीच तेव्हां इथली सन्माननीय पध्दत होती! सगळे तत्कालिन संगीतकार, संयोजक, वादक गपगुमान हीच पद्धत इमाने-इतबारे पाळत असत. या संज्ञेत फिट बसणारी म्हणजेच गाण्याच्या 'ऑन-द-स्पॉट लाईव्ह' वाद्यांसोबत वाजवली जाणारी वाद्ये, यालाच 'अनॉलॉग' अशी संज्ञा आहे!) १९८९ मध्ये आलेल्या 'रोलॅण्ड' कंपनीच्या नव्या 'आर-एट' नामक 'इलेक्ट्रॉनिक ड्रम-मशिन' ने मात्र कमाल केली. तो नवं रूपडं घेऊन आला होता. यात गाण्याची 'क्लिक, टेम्पो-सेटिंग' तसेच 'ऱ्हिदम-सॅम्पलिंग' होऊ शकत होतं. तेव्हा चित्रपटसंगीत कुठे जाणारेय, कुणास ठाऊक असा मनात विचार चमकून गेला होता. कालाय तस्मै नमः!

१९८९ च्या सुरुवातीला जेव्हां रहेमानच्या तामिळ सिनेमाची गाणी मार्केटमध्ये आली, तेव्हां 'हॅवॉक' झालेला. 'सिंथेसायजर व की-बोर्ड' आणि नव्याने आलेला 'ऑक्टापॅड' लाईव्ह वाजवणारे वादक 'सॉलिड कन्फ्युजलेले'! थक्क झालेले! सगळेच (संगीत संयोजक 'केरसी लॉर्ड', 'ताबून सुत्रधार' व 'विजू शाह' वगळता) इथली वादक मंडळींची मानसिकता तितकीशी तयार झाली नव्हती. 'गाण्यांचं' सिंथेसायजर आणि अद्ययावत ऑक्टापॅडच्या मदतीने साग्रसंगीत 'प्रोग्रॅमिंग' करायचं, ही बाब, अगदी कुणाच्याच पचनी पडत नव्हती, परंतु 'ताबुनदादा'ने ती यशस्वी प्रयत्नांती अंमलात आणली. मी स्वतः अनुभवलंय!! संगीतकार भप्पीदांसाठी संगीत-संयोजक ताबूनने 'तम्मा तम्मा लोगे..' (थानेदार -



२१ डिसेंबर १९९० रोजी  प्रदर्शित) हे स्वतःच्या 'सिंथेसायझर' वर आणि नव्यानेच उपलब्ध झालेला 'रोलॅण्ड' कंपनीच्या 'आर-एट' वर पूर्णतः प्रोग्रॅमिंग केलेलं गाणं.. जेव्हा 'मेहबूब स्टुडिओमध्ये'  एकट्यानं (वन् मॅन शो!) रेकॉर्ड केलं ना! तेव्हा उपस्थित वादकांनी आश्चर्याने तोंडात बोटं घातली होती. मात्र तोपर्यंत मेहबूब स्टुडिओमध्ये 'डिजिटल-रेकॉर्डर' नव्हता.  '३५ एम.एम. ऑडिओ-फिल्म' वरच्या टू-ट्रॅक रेकॉर्डरवर' ते रेकॉर्ड केलं, हेही विशेष! नंतर 'सिंथेसायझर्स'वरील 'म्युझिक प्रोग्रॅमिंग'चा जमाना आला. 'रोलॅण्ड' कंपनीच्या 'आर-एट' वर 'ऱ्हिदम-प्रोग्रॅमिंग' सुद्धा होऊ लागलं. जो आपल्या 'लाईव्ह' वादनाने गाण्याला अलंकृत करणाऱ्या वादकांसाठी अक्षरशः मारक ठरला होता. अनेक 'लाईव्ह रेकॉर्डिंगसाठी' बनविलेले मोठ-मोठे स्टुडिओज हळुहळू चक्क बंद होऊ लागले. पुढे 'ए. आर. रहेमान' याच्या आगमनासरशी, हिंदी सिनेमातील गाण्यांच्या एकूणच 'ऱ्हिदम, म्युझिक' या पारंपरिक अशा मुळ संकल्पनेलाच सुरुंग लागल्याने सगळं गणितच बदलून गेलं. परिणाम काय? तर इंडस्ट्रीत काम नाही म्हणून अनेक चांगल्या-चांगल्या वादकांनी आपापली वाद्ये चक्क पोटमाळ्यावर टाकली होती/आहेत. (आजही तीच परिस्थिती आहे. इंडस्ट्रीत आज व्हायोलिन, व्हिओला, चेलो, गिटार, ड्रम-सेट, व्हायब्रोफोन अशा अनेक ज्येष्ठ व जिनियस वादकांकडे चक्क कामंच नाहीत. त्यांनी पोटापाण्यासाठी, जवळच उपलब्ध झालेली योग्य जागा भाड्याने किंवा विकत घेत 'म्युझिक-क्लासेस' उघडलेत. 'पापी पेट का सवाल है भाई!' मी सुद्धा तेच केलं! आमच्या 'व्हीनस म्युझिक कंपनीचा ब्ल्यू-डायमंड स्टुडिओ' बंद झाल्यानंतर, आपल्या उदरनिर्वाहासाठी म्हणून पंधरा वर्षांपूर्वी मी स्वतःची 'म्युझिक प्लॅनेट, विरार' ही संस्था उभारली. (माझी ही अकादमी.. 'गुगलवर' नक्की पहा.) सुदैवाने मीच नव्हे, तर ज्यांनी ज्यांनी, काळाची पावलं ओळखून 'संगीत अकादमी' उभारली ना! ते सर्वजण आज समाधानी आहेत! संगीतसेवा करण्यात मग्न आहेत. आम्ही आपलं 'ब्रेड-बटर' या माध्यमातून कमावत आहोत!) सिनेसंगीतात ॲकॉर्डियन, गिटार, बेस गिटार, मेंडोलिन अशी वाद्ये वाजवणाऱ्या व संगीत संयोजनात माहीर असलेल्या जिनियस वादकांनी, अथक मेहनतीने 'ऱ्हिदम व म्युझिक प्रोग्रॅमिंग' करणं सुरू केलं. आणि याक्षणी ते त्याची फळे रसाळ गोमटी चाखताहेत.

१९९५ नंतरचं पहायचं तर गीतकारांकडून गाणं हातात येताच, त्या संगीतकारांचे, संगीत संयोजक आपल्या म्युझिक-प्रोग्रॅमर्सकडून 'ऱ्हिदम-म्युझिक प्रोग्रामिंग' करून घेऊ लागले. स्टुडिओचं व्यवस्थापन सांभाळताना अनेक संगीतकारांच्या कार्यपध्दतीला जवळून अभ्यासायला मिळालं हे माझं अहोभाग्य! प्रत्येकाच्या सादरीकरणाची स्टाईल वेगळी. कल्याणजींचा (संगीतकार कल्याणजी-आनंदजी फेम) मुलगा विजू शाह हा सन्माननीय अपवाद वगळता कुठलाही संगीतकार, स्वतः प्रोग्रॅमिंग करताना दिसला नाही. सगळे परंपरेचे पाईक. (लक्षात घ्या, सहा दशकांपूर्वी

हेमंतदांनी संगीतबध्द केलेल्या 'नागीन'मध्ये पुंगीचा इफेक्ट काढण्यासाठी की-बोर्डचा (क्ले-व्हायोलिन) वापर करण्यात आला होता. हा म्युझिक इंडस्ट्रीतला पहिला 'की-बोर्ड'! अरेंजर होते संगीतकार रवि, तर हे क्ले-व्हायोलिन वाजवलं होतं विजू शाहच्या वडिलांनी.. कल्याणजींनी!) गाणं तयार झालंय म्हणता रेकॉर्डिंगची तारीख ठरवायला लागले. स्टुडिओ बुक केला जात असे. गाणं 'डिजिटल रेकार्डरवर' बाऊन्स करून होताच वादकांचा ताफा बुक केला जाऊ लागला. ट्रॅकवर तबला/ढोलक, बोंगो/कोंगो या वाद्यमेळाचं वादन रेकॉर्ड होत असे. नंतर 'व्हायोलिन-व्हिओला-चेलो' असा ताफा गाण्यातलं सौंदर्य आकाराला आणत. 'बासरी-शहनाई-क्लॅरोनेट' असं सेक्शन आणखी रंग भरत असे. नंतर गायकांना पाचारण केलं जात असे. नंतर गाण्याचं 'मिक्सिंग'! अगदी सिंपल! परंतु गायकाचा आवाज 'डब' करण्याची पद्धत मात्र तशीच होती. अगदी १९९७ पर्यंत! 'टेक-रिटेक्स्' करत ते उरकलं जाई.



माझ्या सुदैवाने डॉ. एसपी बालसुब्रमण्यमच्या साई-गीतांच्या व्हाईस-डबिंगच्या निमित्तानं मला चेन्नईची वारी करायला मिळाली. डॉ. एसपी यांच्या गाण्यांचे ट्रॅक्स घेऊन त्यांचं व्हाईस डबिंग करायला मी एकटाच गेलेलो. (ज्याला संगीताचं स्कुल म्हणावं असे डॉ. एसपी बालसुब्रमण्यम गाणार म्हणता, त्यांना सुपरवाईज करण्यासाठी तज्ज्ञांची फौज कशाला?) मी कोदंबक्कममधल्या लिबर्टी हॉटेलात उतरलेलो. जवळच ए. आर. रहेमानचा आशियातील सर्वात अद्ययावत असा 'ए. एम. स्टुडिओ' आहे म्हणता मी किती आनंदलोय म्हणून सांगू? एसपींचं डबिंग होतं काही अंतरावर असलेल्या त्यांच्या स्वतःच्या स्टुडिओत. डबिंग वगैरे आटोपताच मी तिथून लगेच निघालो. आधी रहेमानचा स्टुडिओ गाठला. रहेमान तेव्हा दूरवर असल्याने भेट झाली नाही पण त्याचा स्टुडिओ, ताजमहाल पहावा तसा डोळे भरून पाहिला. तो सुरुवातीच्या काळात आपल्या घरामागच्या स्वतःच्या 'पंचतन रेकॉर्ड-ईन' मध्येच ध्वनिमुद्रण करायचा आता इथेच शांतपणे एकेका गाण्यावर काम करत असतो. समर्पित भावानं संस्कार करत असतो. कंपोजर तोच, प्रोग्रॅमर तोच, अरेंजरही तोच! ('वन मॅन शो!..') मी दिवसाला दहा गाणी कंपोज करून रेकॉर्ड करतो अशा फिजूल गमजा कधीच मारत नाही. कारण ते त्याचं कामच नव्हे. तो गाणं आकाराला आणतो. नुसताच की-बोर्ड, सिंथेसायझर, सॅम्पलर वापरून, प्रोग्रॅमिंग करून गाणी उरकत नाही. खमंग फोडणी द्यावी तसा तो त्या जोडीला भारतीय वाद्यांचा चोखंदळपणे उपयोग करतोच करतो. कोरस, हार्मनी, आलापींचा खुबीनं वापर करतो. दिग्दर्शकाकडून गाण्याची सिच्युएशन ऐकल्यानंतर त्यावर तो बराच काळ अभ्यास करतो. निर्माता-लेखक-दिग्दर्शकांना समोर बसवून चक्कीतून

आटा बाहेर पडावा, तश्या भसाभस धुना ऐकवत नाही. गाणं कसं असेल याचे तो आडाखे बांधतो. गुलजारजींसारखे कवी साथीला असल्याने त्याने अर्धी लढाई जिंकलेलीच असते. धून पक्की झाली की तो निश्चिंतपणे कामाला लागतो. गाण्यात कोणती वाद्ये वापरायची त्याचा कॅनव्हास आधीच चितारायचा मग त्यात शांतपणे रंग भरायचे. गडद की फिके हे वादकांवर अवलंबून. दोन अंतऱ्यांच्या मधल्या इंटरल्युडमध्ये एखादा संगीताचा तुकडा फुंकर मारण्याच्या वाद्यानं (म्हणजे बासरी, क्लॅरोनेट, शहेनाई, सॅक्सोफोन, ट्रम्पेट इ.) सजवायचा की तिथे तारा छेडायच्या (गिटार, संतूर, सतार, सरोद, वीणा इ..) हा प्रयोग तो पुनःपुन्हा करणारच. साऊथमध्ये अक्षरशः शेकडो दिग्गज वादक आहेत हो, पण ते त्यांच्या 'दक्षिण भारतीय शास्त्रीय-संगीत' पद्धतीने वादनाच्या कामात माहीर असल्याने, त्याच्याकडून 'बॉलिवूड' फिल्मी स्टाईलचं काम करून घेणं.. तेव्हाच्या त्या नवख्या, तरुण व लहानग्या रहेमानसाठी तसं कठीणच होतं राव! रहेमानच्या कोवळ्या वयाचा विचार केला तर ते बुजुर्ग (काही बाबतीत तर पितृतुल्य) असल्याने त्यांना त्यांच्या घराण्याच्या शास्त्रीय संगीत प्रणालीशी, प्रतारणा करायला लावणं आणि स्वतःला हवे तसे म्युझिकचे पीसेस वाजवून घेणं केवळ अशक्य होतं! त्यांच्या वादनात शास्त्रीय-संगीताचा प्रभाव असल्याने ते सहज मोल्ड होणं जिकिरीचंच होतं, नाही का? रहेमानचा कामाची पध्दत, रागदारी किंवा शास्त्रीय संगीताला आरपार छेद देणारी होती/आहे. (जुन्या जमान्याला चिकटून राहणाऱ्यांच्या भाषेत सांगायचं तर अगदी 'बगावतखोर' म्हणावी इतकी टोकाची!) अशा परिस्थितीत, आपल्या स्व-संकल्पित संगीत-नियोजनासाठी, त्याने नंतरच्या काळात.. आपल्या 'बॉलिवूड' मधल्या 'ज्येष्ठ/श्रेष्ठ' अशा मुंबईतील सीनियर वादकांना चेन्नईत बोलावण्याचा सपाटा लावला असावा असे इंडस्ट्रीतले सीनियर वादक सांगतात. रहेमान त्यांना विमानाची तिकिटं पाठवून बोलावतो. मानधनापोटी बक्कळ पैका देतो. खाण्याची-राहण्याची उत्तम व्यवस्था करतो. सन्मानानं त्यांची खातीरदारी करतो. आपल्याला अमुक गाण्यात, त्यांच्याकडून नेमकं काय हवंय, हे आपलेपणाने आणि नम्रपणे सांगतो! स्वतःच्या वाद्यावर हुकुमत असणारे सन्माननीय वादक रहेमानजींना, त्या चालीनुरूप किंवा त्या शास्त्रीय संगीतातील रागाशी अनुरूप असा, काय आविष्कार करता येईल, याची चर्चा करतात. नंतर, रहेमानजी, त्यांनी सादर केलेले ते 'म्युझिक पिसेस' आपण बनविलेल्या 'ट्रॅक'ला आधारभूत ठेवत.. वेगवेगळ्या, म्हणजे सुमारे दहा-बारा 'ट्रॅक्स'वर रेकॉर्ड करतात. (लक्षात घ्या! हे सन्मा. वादक त्या गाण्यातील अमुक आधारभूत रागांशी पूर्णतः ईमान राखणारे दिग्गज वादक असतात! यात शंकाच नाही!) तर रहेमान, आपल्या संकल्पनेनुसार हवे ते म्युझिक पिसेस, आपल्या संगणकिय 'ट्रॅकमध्ये' मनाजोगतं 'मिक्सिंग' करत ते गाणं आकाराला आणतो. 'संगीतकार ए. आर. रहेमान' यांच्याकडे काम करून आलेल्या 'बॉलिवूड' मधल्या जिनियस वादकांच्या अनुभवावरून, रहेमानच्या कामाची पध्दत नंतर बऱ्याच जणांना माहीत झाली. रहेमानचा नुसता विषय जरी निघाला, की त्याच्याकडे गाणी वाजवून आलेले वादक, गायक त्याच्या कामाची तोंड फाटेस्तोवर स्तुती करायचे. त्याच्या चांगुलपणाचं वारेमाप कौतुक करायचे. आपल्याकडून कसं काम करून घेतलं हे अभिमानानं सांगायचे. रहेमानची 'व्हाईस डबिंग' करण्याची पध्दत मात्र पूर्णतः वेगळी आहे असं गायकमंडळी सांगत असत. गाणी गायलेल्या गायकांनी, तसंच वादकांनी, आपलं 'ट्युनिंग' असलेल्या संगीतकार व संयोजकांना कदाचित, रहेमानच्या 'डिजिटल रेकॉर्डींग' तसंच 'व्हाईस-डबिंगची' पद्धत सांगितली असावी. यातून झालं हेच की सर्वसामान्यांनाच नव्हे तर हजारो स्टुडिओ-तंत्रज्ञांना यातून बाळकडू मिळालं, हे नाकारता येणार नाही! 'ओ ओ जान-ए-जाना..' (कमाल खान), 'आती क्या खंडाला..' (आमिर खान), 'आपून बोला, तू मेरी लैला..' (शाहरुख खान) या गाण्यांमध्ये ती 'आईडिया' वापरली असावी, असं वाटतंय खरं. कारण ही तिन्ही खान-मंडळी नियमीत गायक नाहीत. नंतर हा 'फंडा' सर्वच ठिकाणी वापरला जाऊ लागला. जय हो!

१९४०-४२च्या काळापासून चित्रपटाची गाणी ३५ एमएम 'साऊन्ड-फिल्म'वरच रेकॉर्ड व्हायची. गायक-वादक असा एकत्रित टेक घेतला जाई. मोनो! गायक किंवा वादकाचं चुकलं की पहिले पाढे पंचावन्न! टेक-रीटेक्स! काही तासांचा हा खेळ, पण दमछाक व्हायची सर्वांची. पुढे याच ३५ एमएम 'साऊन्ड-फिल्म' वर टू-ट्रॅक रेकॉर्ड

करण्याची सुविधा आल्यावर, आपल्या कल्पक संगीतकारांनी आणि तंत्रज्ञांनी व्हाईस वेगळा रेकॉर्ड करण्यास सुरूवात केली. नंतर वेगवेगळया प्रकारचे अद्ययावत 'डिजिटल रेकॉर्डर' येऊ लागले. 'कॉम्प्युटरचा' वर 'साऊन्ड-ट्रॅक' रेकॉर्ड करण्याचा पहिला मान 'इलायाराजा' यांच्याकडे जातो. (कमल हासन, डिंपल अभिनित तामिळ चित्रपट 'विक्रम' (मे १९८६) ऐन विशीतला 'ए. आर. रहेमान', या काळात संगीतकार 'इलायाराजा' यांच्या टीममध्ये असल्याने त्याने ते नक्कीच अभ्यासलं असणार. मुंबईत रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये 'कॉम्प्युटरचा'चा वापर करून 'साऊन्ड-ट्रॅक' रेकॉर्ड करण्याची सुरूवात झाली ती अंदाजे १९७८ नंतरच. 'व्ही.एच.एस' (अगदी 'व्हीसीआर'च्या टेप्ससारख्याच दिसणाऱ्या 'साऊण्ड-टेप्स') आणि नंतर 'स्टुडर' कंपनीच्या 'ए८००' स्पूल्स, 'ए-डॅट', 'हाय-एट'! किती नावं सांगू? रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये ही 'कॉम्प्युटरवराईज्ड' सुविधा उपलब्ध होताच कामात सुटसुटीतपणा आला. रेकॉर्डिंगचं तंत्र जसंजसं बदलत गेलं तसा बदल गाण्यांच्या ध्वनिमुद्रणातही होऊ लागला. सिंथेसायझरवर आधी प्रोग्रॅमिंग करून ठेवण्याची सोय उपलब्ध होताच संगीतकार स्टुडिओत दिवसभर प्रोग्रॅमिंग करून घ्यायचे. संध्याकाळी त्या ट्रॅकवर व्हायोलिन, कोरस आणि सोलो वाद्ये डब करून घेत. दुसऱ्या दिवशी गायकांना पाचारण केलं जाई. ही पध्दत चक्क १९९७-९९ पर्यंत रूढ होती. रहेमानची मात्र बातच और! तो स्वतःच कंपोजर, प्रोग्रॅमर आणि अरेंजरही म्हणता त्या गाण्याबाबतीतले त्याचे फंडा किती क्लिअर असतील विचार करा. बऱ्याचदा गाण्याची बेस-लाईन तयार होताच तो गाणं पूर्ण करायच्या भानगडीत न पडता तो सरळ गायकांना पाचारण करतो. गायकांना त्या गाण्याचा बेसिक ट्रॅक ऐकवत तो त्यांच्याकडून तगडी रिहर्सल करून घेतो. मग त्या गाण्याला आवश्यक अशी ॲटिट्युड गायकाकडून मिळतेय म्हणता तो त्याचा-तिचा व्हाईस रेकॉर्ड करतो. तिथे गीतकाराची उपस्थिती असते पण ती फकस्त शब्दोच्चारांकडे लक्ष देण्याएवढी. सध्या संगणकीय-तंत्राने अत्याधुनिक झालेलं ध्वनिमुद्रण तुम्हाला सुमारे २५० ट्रॅक्सची सोय करून देत असल्याने रहेमान त्या गायकाकडून गाण्याचा मुखडा, अंतरा, आलापी, ताना, हरकती जेवढ्या म्हणून घेता येतील तेवढ्या वेगवेगळ्या ट्रॅकमध्ये रेकॉर्ड करून घेतो. आपलं समाधान होईपर्यंत! गायकाचं काम संपलं की त्याच्याशी थोडा वेळ गप्पा मारून त्याला यथोचित मानधन देऊन तो त्याची बोळवण करतो. अनेक ट्रॅकवर व्हाईस घेतल्यामुळे त्याच्याकडे गायकाच्या एकेक शब्दासाठीही बरीच ऑप्शन्स असतात. तुकड्या तुकड्यातून गोधडीच शिवता येते, होय ना? पण रहेमान इतका कल्पक की ते तुकडे जोडून तो एक अतिशय मनोहारी शिल्प आकाराला आणतो. (रहेमानचं परिपूर्ण गाणं ऐकायचं असेल तर 'छैया छैया…' हेडफोनवर निवांतपणे ऐका.) आपण स्वरबध्द केलेली धून, गायकाकडून मनासारखी शब्दबध्द झालेली लक्षात येताच, त्या गाण्याला तो अलंकृत करण्यास सज्ज होतो. दिवस-रात्र त्या गाण्यावर वेगवेगळे प्रयोग करतो. आपण स्वरबध्द केलेले म्युझिकचे पीसेस वेगवेगळ्या वाद्यावर कसे वाजतील, त्याचा काय इफेक्ट येईल हे तो की-बोर्डमध्ये वाजवून पाहत याचा अभ्यास करतो. या गाण्यात शिवमणीचा ह्दिम आणि तालवाद्ये आहेत. गाण्याची झिंग उत्तरोत्तर अशी चढत जाते की बस्स रे बस्स! तो दौर संपूच नये असं वाटतं. गाणं संपल्यावरही त्याचा कैफ मनःपटलावर दीर्घकाळ रेंगाळत राहतो.. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण मुंबईतून येणाऱ्या वादकांनी आणलेले नवोदित गायकांचे, गीतकारांचे डेमो तो आजही आत्मियतेने पाहतो, ऐकतो. सुरूवातीच्या काळात त्याला डेमो पाठवायचं एक फॅडच आलेलं. जो उठेल तो डेमो पाठवायचा. इथे अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले तसेच कंपन्यांचे उंबरठे झिजवून अयशस्वी ठरलेले साधारण दर्जाचे गायक-गायिका आपलं नाव बदलून डेमो पाठवायचे. लॉटरी लागली, राजा उदार झाला आणि ते गाणं नेमकं हिट झालं तर मग काय विचारता? अशा गायक-गायिकेची चांदी झालेली मी या डोळ्यांनी पाहिलीय. शेवटी नशीब! 'खुदा महेरबान तो गधा पहेलवान! ..' लक-फॅक्टर!

'दिल से…' (फिल्म रिलिज २१ ऑगस्ट, १९९८) च्या 'छैया छैया…' ची कुळकथा खरंतर वेगळीच आहे. 'जिहाले मिस्किन..', 'पत्ता पत्ता बूटा..', 'छाप तिलक सब छिनी रे मोसे नैना..', 'बेशक मंदिर..', 'तू चीज बडी है मस्त..' आणि 'थैया थैया..' अशा अनेक रचनांचं मूळ हे सुफी संगीतातलं आहे, हे तुम्ही ऐकलंच असेल! १९९६

साली.. अभिनेत्री-गायिका सलमा आगा जेव्हा कायमचं स्थायिक होण्याचं स्वप्न उराशी बाळगून इथे मुंबईत आली तेव्हां, आल्या आल्या तिने आमच्या 'व्हीनस'च्या एका आगामी अल्बमची जुळवाजुळव सुरू केली होती. इतर चार गाण्यांबरोबर 'तेरे इष्क नचाया चल थैया..' हे गाणं तिने पारंपरिक चालीत, आपल्या आवाजात, रेकॉर्डही केलं होतं.







तो अल्बम पुढे काही अपरिहार्य कारणास्तव बासनात गुंडाळण्यात आला. मध्ये बराच काळ उलटला. पंजाबी कलावंत 'सुखविंदर सिंग' हा उत्तम परफॉर्मर आणि गुणी गायक-संगीतकार. त्याच्या नावाभोवती तेव्हा प्रसिध्दीचं वलय नव्हतं पण आम्हा परिचितांमध्ये तो सर्वांचा लाडका होता व आहे. सळसळतं चैतन्य आणि आक्रमकता हा त्याच्या आवाजाचा स्थायिभाव. त्याची रहेमानशी जान-पहेचान होती. पुढे दोस्ताना झाला. दोघंही कलंदर कलावंत असल्याने नात्यातली वीण अधिकच घट्ट झाली. 'थैया थैया..' हा खरंतर मूळ सुफियाना कलाम. हे शब्द किंवा ही थीम चित्रपटाच्या गाण्यासाठी योग्य होऊ शकते हे सुखविंदरच्या लक्षात आलं होतं. त्याने त्याची पंजाबी स्टाईलने धून बनवली. मोजक्या वादकांच्या साथीनं त्याने ते गाणं परिश्रमपूर्वक रेकॉर्ड केलं आणि रहेमानकडे पाठवलं. इतरांचं डेमो पाठवणं वेगळं आणि सुखविंदरचं वेगळं. त्याच्यातला स्पार्क रहेमानला ठाऊक असल्याने केमिस्ट्री जुळली. रहेमानला त्या ट्रेनवरच्या गाण्याच्या सिच्युएशनसाठी एक फडकती चीज हवीच होती. सुखविंदरला त्याने लगेच बोलवून घेतलं. त्याने स्केचिंग आधीच सुरू केलं होतं. सुखविंदरच्या आगमनानं शर्करावगुंठण झालं. तालवाद्यातला अनभिषिक्त सम्राट शिवमणी साथीला असल्यावर मग काय! त्या तीन दिग्गजांनी मस्त व्यंजन बनवलं. गुलजारजींनी त्यावर काव्य लिहिलं. गाण्यात उर्दु शब्दांची मुक्त उधळण असूनही गाण्याच्या प्रकृतीला साजेशी रचना केली. चपखलपणे बसतील, ओठांवर रूळतील, काळजावर कोरले जातील अशी शब्दांची योजना केली. 'चल छैया छैया छैया ...' हे असं आकाराला आलं. पूर्वीच्या चित्रपटात एखाद्या फडकत्या गाण्यात शमशाद बेगमचा आवाज जसा रंग भरण्यापुरता घेतला जाई तसंच टेक्निक रहेमानने वापरलं. सपना अवस्थीचा ढाल्या आवाज सुखविंदर सिंगच्या आक्रमक आवाजाला पूरक ठरला. गाण्यानं काय इतिहास घडवला ते आपण जाणताच. रहेमानने रसिकांनाच नव्हे तर संगीतकारांनाही झपाटून टाकलं.

रहेमानची यशोगाथा अवाक् करणारी आहे. त्याने भारतीय संगीतावर राज्य तर केलंच, शिवाय तो आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा खूप मोठा झाला. त्याला 'ऑस्कर' सारखा अप्राप्य असा सन्माननीय 'पुरस्कार' सुद्धा मिळाला. रहेमानची गाणी ऐकायची असतील ना, तर अगदी निवांतपणे! त्या रचना आपल्यावर प्रभाव टाकतात. हे इतकं प्रभावी होत जातं की, रसिक-श्रोता अक्षरशः एखादं 'चुंबकिय-आकर्षण' असल्यागत, 'संगीतकार ए. आर. रहेमान'चा 'दीवाणा' होऊन जातो.. हा अगदी नजीकचा इतिहास आहे, यार!! काय सांगू! अथक परिश्रमामुळेच त्याच्या प्रत्येक

आविष्कारात तो १०० टक्के यशस्वी होतो. अगदी इसापनीतीतल्या 'मिडास राजा' प्रमाणे तो ज्या वस्तूला स्पर्श करेल ते सोन्यात बदलतं, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. खरं सांगू? माणसाला यश मिळतं पण ते सतत हुलकावणी देत राहतं. आजचा सुपरहिट कलावंत पुढच्या दोन महिन्यात सुपरफ्लॉप होऊ शकतो इतकं इथलं सिंहासन काटेरी आहे. आश्चर्य म्हणजे रहेमानच्या यशात सातत्य आहे. या शतकातलं संगीत कसं असावं ते त्याने दुनियेला ठणकावून सांगितलंय. त्याचा चौखूर उधळलेला वारू थांबवणं मुश्किलही नही नामुमकिन है! तो नम्रपणे आपल्या यशाचं श्रेय आपल्या टीमला देतो. त्यांची तोलामोलाची साथ आहे म्हणूनच मला यश मिळतं असं तो नेहमीच सांगताना दिसतो. त्याने संगीत दिलेल्या अल्बम्सच्या श्रेयनामावलीत त्याच्या सर्व वादकांचा सन्माननीय उल्लेख असतोच असतो. तुम्ही आयपीएलच्या ट्वेंन्टी-२० मॅचेस आवडीनं पाहतच असाल.(यातील 'ट्रम्पेट' या वाद्यावर वाजवलेली धून 'रॉन विवो' यांची आहे बरं!) तर, चौकार-षटकारांच्या त्या आतषबाजीत खास पेहरावातल्या 'चिअर-गर्ल्स' जसं सर्वांचच लक्ष वेधून घ्यायच्या तसंच एखादा कॅमेरा प्रेक्षक गॅलरीची मस्त सफर घडवून आणायचा. आठवतं? चेन्नई सुपरकिंग्जच्या मॅच असल्या की प्रेक्षकांमध्ये त्यांच्याच पिवळ्या युनिफॉममध्ये एक महाशय आनंदाने चित्कारत ड्रम-सेट बडवताना हमखास दिसायचे. ती व्यक्ती कुणी सामान्य क्रिकेटप्रेमी असावी असा तुमचा समज झाला असेल तर आत्ताच खोडून टाका. तो शिवमणी आहे. तालवाद्यातला शहेनशाह! अनभिषिक्त सम्राट! संत-प्रवृतीचा एक समर्पित कलावंत! 'चल छैया छैया…' (दिल से…) हा रहेमानचा आविष्कार असला तरी त्यात ऱ्हिदम बाबतीतली तोलामोलाची साथ आहे ती शिवमणीची. त्यातला बेस-ड्रम आणि इतर तालवादन (साईड-ऱ्हिदम आणि पर्क्युशन्स) आहे ते याच शिवमणीचं. उस्ताद जाकिर हुसैनचा हा जिगरी दोस्त. या दोघांनी फ्युजनचे चिक्कार शोज केलेत. जगभरात त्याचे लाखो चाहते आहेत. 'दिल से..' च्या पार्टीत तो मला पहिल्यांदा भेटलेला. जुगलबंदी व शोजच्या कामानिमित्ताने तो पुढे खूपदा मुंबईत येत असे. मुक्काम नेहमीप्रमाणे जुहूचं 'सेंटॉर'! शिवमणीने 'दिल से..' च्या पार्टीनंतर आमच्या 'व्हीनसच्या' जुहू येथील 'ब्ल्यू-डायमंड' स्टुडिओला भेट दिलेली असल्याने. संध्याकाळी 'वॉक' करण्याच्या निमित्ताने वरचेवर येऊ लागला.
आता आमच्या परिचयाचं रूपांतर मैत्रीत  झालं. तो आमच्या स्टुडिओत खूप वेळ थांबायचा. मस्त ऋणानुबंध झाल्याने, तिथे असलेल्या संगीतकार, संगीत-संयोजक यांच्याशी आपलेपणाने बोलायचा. गायक 'अल्ताफ राजा' ('तुम तो ठहरे परदेसी..' फेम) याच्याशी, संगीतातील 'कव्वाली' फॉर्म याविषयी विचारायचा. अभ्यास करायचा. संवाद साधायचा. तो येणार आहे, हे आधी समजताच, तर मी बऱ्याचदा, आमच्या कंपनीचे 'बॉस' श्रीमान चंपकजी यांनाही बोलवायचो. आमच्या मस्त गप्पा व्हायच्या! तो 'जुगलबंदीतल्या' गंमती-जमती सांगायचा. 'सेंटॉरमध्ये' अगदी परिपूर्ण 'फाइव्ह स्टार' डिनर उपलब्ध असूनही, तो आमच्यासोबत जेवणाचा मजेत आस्वादही घ्यायचा. मज्जा नी लाईफ! शिवमणी हा त्या काळात वजनदार 'सेलेब्रिटी' झाल्याने तो आता  मुंबईत अनेक 'शोज' किंवा 'जुगलबंदी, कॉन्सर्टस्' च्या निमित्ताने मुंबईत वरचेवर येऊ लागला. परंतु त्याचा 'बॉलिवूड' मध्ये, प्रवेश झाला नव्हता. मला एक कल्पना सुचली. मी गप्पांच्या ओघात त्याला विचारलं.. 'मणीजी.. आप हमारे कंपनी के गानों में, 'ऱ्हिदम' करेंगे, तो सच में मजा आएगा..' तो चटकन् म्हणाला..'हाँ.. हाँ.. व्हाय नॉट..!' मी हे विचारलं खरं पण नंतर, विचारात पडलो. कारण प्रत्येक संगीतकारांची स्वतःची अशी 'टीम' असते. अमुक संयोजक, वादक यांच्याशीच 'ट्युनिंग' असते, त्यातच ते 'कम्फर्टने' काम करत असतात. मी हिम्मत करून आमच्या 'बॉस' ना विचारलं.. 'आपण 'शिवमणी'ला आपल्या फिल्मी गाण्यातील 'ऱ्हिदम पोर्शन'साठी पाचारण करूया का? आय एम शुअर! तो नक्कीच हो म्हणेल.. त्याचं 'बॉलिवूड' मधलं पदार्पण, आपल्या गाण्यांमधून झालं तर मस्तच!..' त्यांना ती कल्पना आवडली. कारण.. तोपावेतो शिवमणीशी त्यांचाही दोस्ताना झालेला. योगायोगाने त्या दिवसात अनु मलिक संगीतबद्ध करत असलेल्या, शाहरुख खान अभिनित 'बादशाह' आणि 'जोश' च्या गाण्यांची रेकॉर्डिंग्ज सुरू होती. 'बॉस' श्री. चंपकजींनी चक्रे फिरवली. अनू मलिकनेही होकार दिला. 'शिवमणी' याने अलंकृत केलेली ती गाणी ऐकून पहा. या गाण्यात शिवमणीचं अस्तित्व ठळकपणे आढळतं. आमच्या मैत्रीखातर त्याने पुढे अल्ताफ राजाच्या एका अल्बमसाठीही काम केलं. एवढ्या वाद्यांवर हुकुमत असणं म्हणजे खायचं काम नाही

महाराजा! शिवमणी मोठ्या ट्रकमध्ये मावेल एवढी वाद्ये घेऊन रेकॉर्डिंगला येतो. त्या वाद्यांची स्वतःभोवती गोलाकार मांडणी करायला सुमारे तीनशे स्क्वेअर-फूट जागा लागते. पंधरा/वीस माईक लागतात. (सोबतचं छायाचित्र पहा.) त्याच्याकडून काम करून घ्यायचं तर पेशन्स हवा. ऐकलं-समजलं-वाजवलं असा पाट्या टाकण्याचा मामला नाही. तो आधी तुम्हाला हवा तो ऱ्हिदम, हव्या तेवढ्या ट्रॅक्स मध्ये शांतपणे रेकॉर्ड करु देतो. तुमचं समाधान झालं की आता तो स्वतःच्या समाधानासाठी काही वाद्यांचे पीसेस वेगवेगळ्या ट्रक्समध्ये रेकॉर्ड करून देतो. (हवं तर वापरा नाहीतर पुसून टाका.) तालसम्राट शिवमणी मध्ये उभा राहून मुक्त संचार करत एकेक वाद्य अशा शिताफीने वाजवतो की तुम्ही डोळे विस्फारुन पाहतच बसता. अथक परिश्रम करण्याची तयारी आणि कामात झोकून देण्याच्या त्याच्या स्वभावामुळेच आज तो या अढळ पदावर विराजमान आहे. (इतकी मोठी 'सेलेब्रिटी' व्यक्ती, पण त्याचं स्वभाव वैशिष्टय पहा. आजही आपल्या 'बॉलिवूड' मधील पदार्पणाचे ते क्षण, तो विसरलेला नाहीय.) रहेमान, ध्वनिमुद्रक एच. श्रीधर, शिवमणी, रणजीत बारोट.. अशा असंख्य तपस्वींनी जी संगीतशिल्पं उभारलीयत त्याला तोड नाही. (तालसम्राट 'शिवमणी'शी संबंधित 'यू-ट्युब' ची 'प्ले-लिस्ट' खास तुमच्यासाठी सोबत दिलेली आहे.)




रहेमानची फिल्मोग्राफी पाहिलीत तर, 'दिल से...' (१९९८) च्या आसपास बरेच चित्रपट स्वीकारल्यामुळे तो खूपच बीझी झाला होता. निर्मात्यांची रांग लागलेली त्याच्याकडे. कामाचा इतका अतिरेक झाल्यावर एक क्षण असा आला की त्याने नवं काम घेणंच थांबवलं. वर्षाकाठी मोजून पाच ते सहा चित्रपट करायचे अशी मनाशी खुणगाठ बांधली. 'शो मन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुभाष घईसाहेबांना तो आगामी चित्रपटासाठी हवा होता. परंतु त्यांनाही त्याने झुकतं माप न देता, आपली वाट पहायला लावली, हे तुम्ही पेपरातून वाचलंच असेल. 'खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी!..' अशी मानसिकता असलेली, चित्रपटसृष्टीतली बडी हस्ती असा ज्यांचा नावलौकिक, ते चक्क रहेमानसाठी थांबले. 'ताल'च्या गाण्यांनी काय इतिहास घडवलाय ठाऊक आहे ना? अतिपरिचयात अवज्ञा होते म्हणून कदाचित 'ताल'नंतर तो निर्मात्यांना तीन वर्षांनंतर या असं नम्रपणे सांगू लागला. तो फारच चूझी झाला. आपण आता ए. आर. रहेमान यांची, हिंदी चित्रपटांपुरती 'फिल्मोग्राफी' पाहुया! (यात इतर भाषेतून हिंदीत 'डब' झालेल्या सर्वच सिनेमांचा अंतर्भाव नाहीय,

हं!) 'रोजा' (१९९२) हा रहेमानचा पहिला चित्रपट, तो सन्मानानं हिंदीत आला! गाजला सुद्धा! नंतरच्या काळात त्याच्या तामिळ/तेलुगू/मल्याळम भाषेतल्या जवळजवळ सर्वच सिनेमातली गाणी हिंदी भाषेत 'डब' होऊन मार्केटमध्ये येत राहिली. 'गीतानुवाद कंत्राटदार' आणि सर्वच म्युझिक कंपन्यांनी आपापलं उखळ पांढरं करून घेतलं. आपापली पोळी भाजून घेतली! ही हिंदीमध्ये 'डब' झालेली गाणी असलेल्या, किती चित्रपटांनी 'हिंदी' भाषेतला 'डब' सिनेमा म्हणून, पुढे खरोखरच रुपेरी पडदा पाहिला?.. हे निदान मला तरी ठाऊक नाही! असो! रहेमानने संगीत दिलेल्या हिंदी सिनेमांच्या यादीत पुढे नाव येतं ते 'रंगीला'चंच (१९९५)! नंतर 'हिंदुस्तानी' (१९९६), राम गोपाल वर्मांचा 'दौड' आणि 'फायर' (१९९७), 'कभी ना कभी', 'जीन्स', 'डोली सजा के रखना', 'सपने' (१९९८), 'ताल', 'लव्ह यू हमेशा', 'तक्षक' (१९९९), 'पुकार', 'दिल ही दिल में' (२०००), 'झुबेदा', 'वन-टू का फोर' आणि 'लगान' (२००१), 'द लिजेंड ऑफ भगतसिंग', 'साथिया' (२००२), 'तहजीब', (२००३) 'मिनाक्षी', 'स्वदेस', 'दिल ने जिसे अपना कहा', 'युवा' (२००४), 'नेताजी सुभाषचंद्र बोस - द फरगॉटन हिरो', 'मंगल पाण्डे- द रायजिंग', 'किस्ना-द वॉरियर पोएट' (२००५), 'रंग दे बसंती' (२००६), 'गुरू', 'शिवाजी - द बॉस' (२००७), तर २००८ मध्ये 'जोधा अकबर', 'जाने तू..या जाने ना', 'अदा - अ वे ऑफ लाईफ', 'युवराज', 'गझिनी', 'स्लमडॉग मिलेनियर'! तर २००९ साली 'दिल्ली ६' आणि २०१० चे 'ब्ल्यू'! 'रावण', 'झूठा ही सही'! तर २०११ चे 'रॉकस्टार', 'एक दीवाना था'! नंतरचे चित्रपट पाहता.. 'जब तक है जान' (२०१२), 'हाय वे', 'लेकर हम दीवाना दिल' (२०१३-१४), 'तमाशा' (२०१५), 'मोहेन-जो-दारो' (२०१६), 'ओके जानू', 'सचिन-द बिलियन ड्रीम्स', 'मॉम' (२०१७), 'बियॉण्ड द क्लाऊडस्' (२०१८), 'द फकिर ऑफ व्हेनिस' (२०१९) आणि 'शिकारा' (२०२०), '९९ सॉन्ग्ज', 'मिमी', 'अतरंगी रे!' हे २०२१ सालचे! २०२२ चे 'हिरोपंती-२', 'मिली'! 'गांधी-गोडसे -एक युद्ध', 'पिप्पा' (२०२३) अशी यादी 'विकिपिडिया' वरील उपलब्ध माहितीनुसार दृष्टीपथात येते. (दिमतीला 'प्ले-लिस्टस्' तर आहेतच. 'रोजा' हिंदी भाषेत उपलब्ध नाही, तो वगळता, मी 'फोटो-फिल्मोग्राफी' सुद्धा दिलीय. फक्त पोस्टरवर 'क्लिक' करा, व पूर्ण सिनेमा पहा.) त्याचे या क्षणी (म्हणजे २०२४च्या मार्च महिन्यापर्यंत) आगामी असे 'लेबल' लागलेले, म्हणजे.. बोनी कपूरचा 'मैदान', सनी देओलचा 'लाहोर-१९४७' आणि धनुषचा 'तेरे इष्क में'..! बस्स!! वरची यादी नीट पाहिलीत तर, रहेमान गाजला पण आपली सारी फिल्मी-दुनिया रहेमानमय झाली, असं नाही घडलं. त्याचं संगीत असलेल्या चित्रपटाचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात होतो पण गाण्याच्या अल्बम्सची विक्री आधी अतिशय संथ असते, पण पुढे ती इतकी आश्चर्यकारक पकड घेते की बस रे बस्स!. नंतर माल सप्लाय करता त्या म्युझिक कंपन्यांची दमछाक झाल्याचं मी स्वतः पाहिलंय. मधला काळ रहेमान लाईमलाईटमध्ये नव्हता. चित्रपटसंगीतात वेगळ्याच नावांची चलती होती. 'हम दिल दे चुके सनम' मध्ये इस्माईल दरबार गवसला. 'फना'मुळे जतीन-ललित पुन्हा चर्चेत आले. हिमेश रेशमिया 'अक्सर'मुळे असा काही चमकला की नंतर अशी परिस्थिती आली की येणाऱ्या दहापैकी आठ चित्रपट त्याचेच असायचे. शेवटी अजीर्ण झालं. त्याच्या 'उऊऽऽ!'च्या बाराखडीने पब्लिक वैतागलं. 'धूम' (२००४) मुळे संगीतकार प्रीतम चक्रवर्ती इतका फॉर्मात आला की त्याने परवाच्या 'ॲनिमल' पर्यंत धुमधडाक्यात बॅटिंग केलीय. (कामात सातत्य असल्याने हा भिडू आजही नाबाद आहे.) आज शंकर-एहसान-लॉयने एक बाजू मस्त लावून धरलीय. गेल्या दोनेक वर्षात अनेक नवे संगीतकार आलेत. आपापली किस्मत आजमावताहेत. यशस्वी सुद्धा झाले, हे विशेष! आधीच्या काळात एकेक संगीतकाराचा दौर यायचा. आमच्या पिढीने शंकर-जयकिशन, ओ.पी. नय्यर, पंचमदा, लक्ष्मी-प्यारेजी, भप्पी लाहिरी, नदिम-श्रवण अशा अनेक संगीतकारांची बादशाहत पाहिलीय. रहेमानच्या कामात सातत्य आहे, तो लंबी रेस का घोडा हे कबूल! पण 'सारी दुनिया मुट्ठी में' असा लंबा दौर नाही आला हेही तितकंच खरं. पण पठ्ठ्याचं नशीब पहा. त्याच्या वाटणीला मोजकेच चित्रपट आले पण प्रत्येकातून किमान एक-दोन गाणी तरी क्लीक झालीच झाली. आलेख चढता नसला तरी किंचितही खाली आला नाही हे मात्र नक्की!

आवर्जून उल्लेख करायचा तर, ३० ऑगस्ट, २००८ रोजी 'स्लमडॉग मिलेनियर' (इंग्रजी व हिन्दी) भाषेत झळकले. पण का, कुणास ठाऊक! त्याबद्दल पेपरांमध्ये केवळ दखल घ्यायची म्हणून घेतल्यागत मोजकंच छापून आलं होतं. 'डॅनी बोएल' नामक एका परदेशी निर्मात्यानं हिन्दी-इंग्रजी चित्रपट बनवलाय. त्याला आपल्या ए. आर. रहेमानचं संगीत आहे. झोपडपट्टीतला एक छोकरा 'कौन बनेगा करोडपती' सारख्या एका कार्यक्रमातून करोडपती होतो असा या चित्रपटाचा स्टोरीबोर्ड आहे.. वगैरे! स्पष्टपणे सांगायचं तर, सिनेमा थिएटर्स आणि मल्टीप्लेक्सवाल्यांनाही त्याची अजिबात उत्सुकता नव्हती. ते सगळे 'हाल-ए-दिल', 'सरकार राज', 'हिरोज', 'एक विवाह ऐसा भी', 'दोस्ताना' अशा अनेक चलती असलेल्या सिनेमांमध्ये गुंतले होते. गंमत म्हणजे हा 'स्लमडॉग करोडपती' (हिन्दी) हा चित्रपट प्रदर्शित होताच गाजला, असं मात्र घडलंच नाही! का? माहीत नाही! 'जय हो!..' हे त्यातलं गाणं मात्र खूप खूप गाजलं होतं. चक्क महाराष्ट्रातील दुर्गम अशा अनेक विभागातही, चक्क हिट झालं होतं. मात्र.. इथे सर्व काही आलबेल असताना. अचानक बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी, रात्री साडेनऊ वाजता, दक्षिण-मुंबईतील, आठ गर्दीच्या ठिकाणी भयानक असा अतिरेकी हल्ला झाला होता. मुंबई पूर्णतः सुन्न झाली होती. चार महत्त्वाच्या पोलिस अधिकाऱ्यांसह अनेक मृत्यू, जखमी! हा खेळ चक्क तीनेक दिवस सुरू होता. एक दहशत! त्या हल्ल्यातील मृत्यू, त्या हल्ल्याच्या जखमा, इतक्या खोलवर होत्या की 'मनोरंजन' या गोष्टीत पुढचे अनेक दिवस कुणालाच अजिबात इन्टरेस्ट नव्हता. सिनेमा/नाटक थिएटर्स, मॉल्स, मल्टीप्लेक्स.. इतकंच नव्हे तर, मुंबईतले सर्वच मुख्य रस्ते, हाय वे वगैरे.. पुढचे अनेक दिवस चक्क ओस पडलेले. त्या क्षणी कोवळया वयात असलेली आमची बच्चेकंपनी, आपल्या पप्पा-मम्मीला निरागसपणे विचारत होती.. 'पप्पा! तुमच्या लहानपणी असं काही भयंकर घडत असायचं का?' काय बोलणार? निःशब्द! दरवर्षी सर्व धर्मातील लोकांकडून नववर्षाचं स्वागत म्हणून, जल्लोषात साजरा होणारा तो 'नाताळ' यावर्षी मात्र खूपच उदासवाणा होता. जणू मानसिक खच्चिकरण झालेलं सर्वांचं! पण नेमक्या 'ख्रिसमस' च्याच दिवशी.. आमिर खान अभिनित 'गझिनी' प्रदर्शित झाला. लेखक/दिग्दर्शक 'ए. आर. मुरगादोस' तर संगीत 'ए. आर. रहेमान' याचं होतं! (ज्याला पुढे या चित्रपटातील 'सर्वोत्कृष्ठ संगीतकार' म्हणून 'फिल्मफेअर ॲवॉर्ड' मिळालं.) 'गझिनी' प्रदर्शित होताच लगेचच तो सुपरहिट झाला असे अजिबात म्हणता येणार नाही. कारण, मायबाप प्रेक्षक अजूनही सावरलेच नव्हते. थिएटर्सकडे फिरकायला धजावत नव्हते. (या काळात माझं 'फन-फिएस्टा, नालासोपारा' या 'मल्टिप्लेक्स' मध्ये 'ऑडिओ-व्हिडिओचं शो-रूम' असल्याने मी हे स्वतः हे सगळं प्रत्यक्ष अनुभवलंय! विक्री अक्षरशः मंदावलेली! शेवटची घरघर लागलेली जणू! नंतर आम्ही अनेक विक्रेत्यांनी निराश होऊन गाशा गुंडाळला.) सुदैवाने जानेवारीत 'माऊथ-पब्लिसिटी' मुळे पब्लिक थिएटरकडे वळू लागलं. 'गझिनी' ची गाणी क्लीक होऊ लागली होती! (अल्बमची सर्वत्र तडाखेबंद विक्री झाली.. तसेच हा चित्रपट शंभर करोडचा पहिला मानकरी ठरला होता, हे विशेष!) 'गझिनी' गाजला!



तर.. आता 'स्लमडॉग मिलेनियर' कडे वळूया! जानेवारी २००९ मध्ये एकीकडे 'गझिनी'ची गाणी लोकप्रियतेची पकड घेत असताना.. 'जय हो!..' हे गाणं सगळीकडे गाजू लागलं होतं. ते 'स्लमडॉग मिलेनियर' नामक सिनेमातलं आहे म्हणता लोक आश्चर्यचकित झाले होते. कारण गाणी सहज उपलब्ध होत नव्हती. या काळात कॅसेटस् तर केव्हाच हद्दपार झाल्या होत्या. त्यामुळे रस्तोरस्ती असणाऱ्या 'स्टॉल्स'नी गाशा गुंडाळला होता. 'व्हिडिओ-सीडीज', 'म्युझिक-सीडीज' ची विक्री हळुहळू मंदावत होती. त्याची जागा आता 'एम्.पी.थ्री.' ने घेतली होती. त्याही 'पायरेटेड' स्वरूपातल्या असत, व अमुकच ठिकाणी मिळत. खरंतर, 'यू-ट्युबच्या' अचानक आगमनामुळे, 'ऑडियो-व्हिडिओ मार्केटने' जणू मान टाकली होती. विक्री जणू शेवटच्या घटका मोजत होती! (आम्ही म्युझिक कंपनीवाले.. आपल्या 'ब्रेड आणि बटर' असलेल्या, आमच्या होलसेल मार्केटशी सतत संपर्कात असायचोच असायचो! मात्र तिथली त्या काळातली एकंदर उदासिनता, सध्या कोणत्याही मालाला अजिबात उठाव मिळत नाहीय हे दुःख, आणि त्यांचा हताशपणा.. पाहून वाईट वाटायचं! 'ऑडियो-व्हिडिओचे मुख्य होलसेलर्स व डिस्ट्रिब्युटर्स' यांनी तर लवकरच आटोपतं घेतलं.) असो! चित्रपट कसाही असेल परंतु.. शीर्षकातील 'स्लमडॉग' या शब्दावर बराच वादंग झाला, हे मात्र नक्की! महानायक अमिताभ यांच्या टिप्पणीने तर वातावरण आणखी ढवळून निघालं होतं. एक मोठा विवाद उभा झाला होता. या चित्रपटात, एके ठिकाणी 'जमाल' याला, अमिताभ 'ऑटोग्राफ' देतायत असं भले दाखवलंय. पण नंतर 'कौन बनेगा करोडपती' या अमुक 'शो'चं संचालन करताना दाखवलाय कोण? तर अनिल कपूर! हे कसं काय बुवा? महानायक अमिताभ हेच 'कौन बनेगा करोडपती'चं सूत्रसंचालन करतात ना.. मग?! १३ जानेवारी, २००९ रोजी अमिताभने आपल्या ब्लॉगवर बरीच आगपाखड केलेली आहे. 'हा सिनेमा बटबटीत आहे. त्यात.. आपल्या भारतातली गरीब परिस्थिती इतकी हलाखीची दाखवत, अधोरेखीत करण्याची काही गरज होती का? ती चव्हाट्यावर आणून इथे त्यांनी नेमकं काय साधलंय? वगैरे!..' पण लोक त्या काळात इतके परेशान होते की महानायक अमिताभच्या त्या ब्लॉगवरील आगपाखड, याकडे लक्ष देण्याची मानसिकता लोकांमध्ये अजिबात नव्हती. त्यात तितकीशी धार नव्हती असंच म्हणावं लागेल. यातलं 'रिंगा रिंगा..' हे गाणं 'चोली के पिछे क्या है..' सारखंच असल्याचं लोक म्हणत. मात्र.. २२ फेब्रुवारी, २००९ रोजी 'स्लमडॉग मिलेनियर' या सिनेमाचं 'ऑस्कर'साठी मानांकन मिळून त्याने दहापैकी आठ विभागात विजेतेपद मिळवलंय ही वृत्तपत्रात झळकलेली बातमी वाचून मात्र लोकांनी कान टवकारले. अरे!! हा तर आपला भारतीय सिनेमा! 'ऑस्कर' मिळणं ही गोष्ट अभिमानास्पद असल्याने पुढे होता नव्हता तो विरोध पूर्णतः मावळला. मिडियाने ऑस्कर-सोहळा अगदी दिमाखात दाखवला. लोकांनी तो चवीनं पाहिला. 'स्लमडॉग मिलेनियर'ने ऑस्कर पुरस्कार मिळवले ही बातमीच सनसनाटी होती. आपल्या रहेमानला, गुलजारजींना ऑस्कर मिळाल्याचं ऐकून सगळे रसिक मनोमन सुखावले होते! चित्रपटाची समीक्षा अजिबात करण्याचा हेतू नाहीय.. पण खरं सांगू? 'स्लमडॉग मिलेनियर' (इंग्रजी, हिन्दी) अनेक रसिकांनाही तितकासा नाही आवडला. तो अत्यंत भडक आणि बटबटीत वाटला. झोपडपट्टीत राहणारा एक सर्वसामान्य गरीब मुलगा 'कौन बनेगा करोडपती' टाईप कार्यक्रमातून 'करोडपती' होतो ही मूळ कन्सेप्ट भले आवडली, पण बाकी गोष्टी म्हणजे.. भारतातली गरीब परिस्थिती इतक्या भडकपणे मांडण्याची खरोखरच गरज नव्हती. ऑस्करमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरविण्यासाठी नेमकी कोणती फुटपट्टी वापरतात? याबद्दल मी खरंच अनभिज्ञ आहे! ऑस्करच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचलेला 'लगान' काय वाईट होता? अरुण नलावडे या माझ्या जिगरी दोस्ताचा 'श्वास' त्यांना कळला नाही? आमिर खानचा 'तारे जमींपर'ने काय घोडं मारलेलं? म्हणजे त्यांना भडक आणि बटबटीत सिनेमाच आवडतो की काय? (मग यासाठी आमच्या धर्मेश दर्शनचा 'मेला' परफेक्ट चॉईस होताच की!) इंग्लंड निवासी दिग्दर्शकाने केला, म्हणून ऑस्कर दिला असेल की काय? 'स्लमडॉग मिलेनियर'चं संगीत रहेमाननं करावं यासाठी दिग्दर्शक डॅनी बोएलने गळ घातली होती. थोडक्यात कथानकही ऐकवलं होतं. एक परदेशी माणूस, भारतीय लेखक 'विकास स्वरूप' यांच्या कादंबरीवर आधारीत स्टोरीचा प्लॉट घेऊन आलाय म्हणता त्याला नाही म्हणवलं नसावं. मला खात्री आहे! सगळी कामं बाजुला सारून त्याने सवड काढली असावी. दोन महिने ढोर

मेहनत करत लंडनला जाऊन स्कोर बनवला होता. आणि पुढच्या केवळ दोन आठवड्याच्या अवधीत त्याने ध्वनिमुद्रण केलं, हे विशेष! त्याने आपला जीव ओतून 'जय हो..' आणि 'ओ साया..' सारखी निहायतही ख़ूबसुरत गाणी बनवली. रहेमानने 'जय हो..' हे गाणं खरंतर सलमान खानच्या 'युवराज' (२००८) साठी तयार केलेलं, पण ते 'स्लमडॉग मिलेनियर' च्या पटकथेत चपखलपणे बसतंय, हे लक्षात येताच ते इथे वापरलं. सोमवार दि. ५ नोव्हे. २००७ रोजी 'स्लमडॉग मिलेनियर'चं शूटिंग मुंबईत सुरू झालं. दि. ३० ऑगस्ट २००८ या दिवशी टेल्युराईड फिल्म फेस्टीवलमध्ये तो पहिल्यांदा दाखवला गेला. नंतर दि. ७ सप्टेंबर २००८ रोजी टोरँटो इन्टरनॅशनल फिल्म फेस्टीवलमध्ये दाखवला गेला. तिथे त्याचं कौतुकच झालं. १२ नोव्हेंबर, २००८ रोजी तो सर्वप्रथम उत्तर अमेरीकेत झळकला. या फिल्मने तिथे खोऱ्यानं पैसा ओढला म्हणतात! ३५१ प्रिन्टस्‌ने तो २२ जानेवारी २००९ रोजी भारतात सर्वत्र प्रदर्शित झाला. हिन्दुस्थानी चित्रपटसंगीताच्या इतिहासात कुठल्याच संगीतकाराला 'ऑस्कर' मिळाला नव्हता, ही वस्तुस्थिती आहे.

ए. आर. रहेमान याने १९९७ मध्ये देशाच्या स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण होणार आहेत म्हणता, 'वंदे मातरम' हा अल्बम बनविला होता. दि. १२ ऑगस्ट, १९९७ रोजी 'सोनी म्युझिक कंपनी' तर्फे तो दिमाखात प्रकाशित करण्यात आला. यातील रहेमान याने स्वतः गायलेलं 'माँ तुझे सलाम..' हे गाणं, देशातील सर्व राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय समारंभांमध्ये सन्मानाने वाजवलं जातं. अल्बममधील सर्वच गाणी अतिशय सुंदररित्या सादर करण्यात आली आहेत. यातील 'उस्ताद नुसरत फतेह अली खान' आणि 'रहेमान' यांनी गायलेलं 'गुरूज ऑफ पीस..' नक्की पहा/ऐका. 'राष्ट्रीय-एकात्मतेचा' संदेश देणारं हे गाणं, खचितच वाखाणण्याजोगं आहे. देशाला समर्पित अशा या अल्बमचं जगातील सुमारे अठ्ठावीस देशांमध्ये वितरण झालं. अल्बमच्या लाखो प्रती देशातही विकल्या गेल्या. या अल्बमच्या लोकप्रियतेची नोंद 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये झालीय, हे विशेष! दोन 'ऑस्कर' आणि दोन 'ग्रॅमी' अ‍ॅवॉर्ड जिंकणारा तो पहिला भारतीय संगीतकार आहे. तसंच 'बाफ्टा' पुरस्कार, 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार, तसेच चार 'राष्ट्रीय चित्रपट' पुरस्कारांनी त्याचा सन्मान झालेला आहे. त्याला पंधरा 'फिल्मफेअर अ‍ॅवॉर्डस्' व तेरा 'साऊथ फिल्मफेअर अ‍ॅवॉर्डस्' मिळाले आहेत. २००८ मध्ये त्याने चेन्नईमध्ये 'के. एम. कॉलेज ऑफ म्युझिक अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी'ची स्थापना केली. इथे 'भारतीय व पाश्चिमात्य शास्त्रीय संगीत' व 'संगीत तंत्रज्ञान' शिकवलं जातं. या संस्थेतील 'डिप्लोमा' आणि 'डिग्री' साठी देशातीलच नव्हे परदेशी विद्यार्थी सुद्धा शिक्षण घेत आहेत. इथे पारंगत झालेले विद्यार्थी, संगीतकार ए. आर. रहेमान यांच्या चित्रपट/अल्बम्स तसेच पार्श्वसंगीताच्या ताफ्यात आपल्या कलेची पेशकश करतात, हे कौतुकास्पद! नोव्हेंबर, २०१३ मध्ये कॅनडा येथील 'मार्कहम-ओन्टारियो' येथील एका रस्त्याला 'ए. आर. रहेमान' यांचं नाव सन्मानाने देण्यात आलं. तर २४ एप्रिल, २०२४ रोजी त्याला 'लता मंगेशकर' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

या पुस्तकाची 'परिसीमा', अर्थात कळसाध्याय गाठण्याआधी एक महत्त्वाचं काही 'शेअर' करतोय. नक्की वाचा! तुम्ही 'ए. आय' (अर्थात 'कृत्रिम गुणवत्ता'-'आर्टिफिशियल इंटेलिजन्स') याविषयी ऐकलंच असेल ना! तुम्हाला आठवत असेल. मे महिन्यात काही दैनिकांमध्ये 'झपाटलेला-३' बद्दल एक आनंदाची बातमी आली होती. या चित्रपटात चक्क आपल्या सर्वांचा लाडका 'लक्ष्या' अर्थात दिवंगत अभिनेता 'लक्ष्मीकांत बेर्डे' पहायला मिळणार आहे. आणि यासाठी 'ए. आय' (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) ची मदत घेतली जाणार आहे. त्यावेळी दिलेल्या एका मुलाखतीत 'महेश कोठारे' म्हणाले होते.. 'लक्ष्या हा माझा अत्यंत जिवलग मित्र होता. आजही तो माझ्याबरोबर आहे, मला मार्गदर्शन करतो, असं मला सतत वाटत असतं. लक्ष्मीकांतने खूप चित्रपट केले, त्यात लक्षात राहणारे जे चित्रपट आहेत ते माझ्यासोबत होते. आमचं जबरदस्त 'ट्युनिंग' होतं. माझा 'पछाडलेला' हा त्याचा शेवटचा चित्रपट ठरला. दुर्दैवाने त्याच वर्षी तो गेला..' पुढे ते म्हणाले.. 'मला लक्ष्मीकांत बरोबर पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. 'ए. आय.'चा उपयोग करून मला आपल्या लक्ष्मीकांतला पुन्हा 'रिक्रिएट' करायचंय. त्याला मी पुन्हा 'स्क्रीनवर' आणणार आहे.

पुन्हा महेश-लक्ष्याची जोडी दिसणार. २०२५ मध्ये 'झपाटलेला-३' प्रदर्शित होईलच, पण तो नेमका कसा असणार, याबाबत मात्र आत्तापासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढलीय. या बातमी नंतर दोनच दिवसात आणखी एक बातमी वाचून लोक पुन्हा एकदा थक्क झाले. लक्ष्मीकांतचा मुलगा 'अभिनय बेर्डे' याने 'आज्जीबाई जोरात' या नाटकातून व्यावसायिक रंगभूमीवर नुकतेच पदार्पण केले आहे. मराठी रंगभूमीवर पहिल्यांदाच, होत असलेल्या 'ए. आय. - अनाऊंसमेंट' ला प्रत्येक प्रयोगाला टाळया मिळताहेत. 'ए. आय.' च्या तंत्रज्ञानाने जगाला चुणूक दाखवलीच आहे. रंगभूमीच्या प्रेक्षकांनीही त्याचा अनुभव घ्यावा म्हणून हा अनोखा प्रयोग आम्ही केला आहे, असं नाटकाचे लेखक-दिग्दर्शक 'क्षितिज पटवर्धन' म्हणाले. या 'अनाऊंसमेंट'ला लक्ष्मीकांत बेर्डे यांचा आवाज लाभल्याने ते जणू आपल्या मुलाला आशीर्वाद देत आहेत असं वाटतं. या 'ए. आय. टेक्नॉलॉजीबद्दल' तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांना अजिबात आश्चर्य वाटलं नसेल. परंतु आपल्यासारख्या सामान्य माणसासाठी तरी ती चकित करणारी गोष्ट आहे. म्हणूनच हा लेखाजोखा!

'ए. आय.' हा विषय मुळातच इतका गहन आहे ना! की, तो सखोलपणे अभ्यासायचा म्हणजे 'स्काय इज द लिमिट'! मात्र आपण त्याचा काही भाग थोडक्यात जाणून घेऊया. आपल्या मोबाईल फोनमधील अनेकाविध 'ॲप्स', 'सॉफ्टवेअर्स', गुगल सर्च इंजिन व त्यावर आपलं ते गुगल मॅप पाहणं, लाईव्ह-लोकेशन दिसणं इतकंच नव्हे तर हातातलं 'स्मार्ट-वॉच', अद्ययावत 'सी.सी.टी.व्ही.', डिपार्टमेंटल स्टोअर्स मधले कॅश-बॉक्स' वगैरे गोष्टींना तांत्रिक गोष्टींचा 'सपोर्ट' दिलेला असतो. आधी 'फिड' केलेल्या आदेशांनुसार ते ते यंत्र आपली कामगिरी बिनबोभाट पार पाडत असते. हल्ली 'फेसबुक' वर अनेकाविध गोष्टींची रेलचेल असते. लोक त्या गोष्टींचा मनमुराद आनंद घेत असतात. तिथे लोकांनी स्वतःचे फोटोज, व्हिडिओज किंवा रिल्स टाकलेल्या असतात, हे आपण जाणताच. मात्र हल्ली एक वेगळाच ट्रेण्ड आलाय. विविध 'ॲप्स'च्या लिंक्समधून बऱ्याच थक्क करणाऱ्या गोष्टी सामोऱ्या येतात. त्यात आपल्या वाड-वडिलांच्या जुन्या फोटोचं 'ग्राफिक्स' ने 'व्हिडिओ' मध्ये रूपांतर करणं असतं. किंवा आपल्या व्हिडिओमध्ये आवाज/संगीत टाकून 'ॲनिमेशन' केलेल्या 'शॉर्ट-रिल्स' क्षणार्धात बनवून मिळतात. आपला फोटो काही अमुक 'ॲप्स' मध्ये टाकताच, आपण लहानपणी कसे दिसत होतो.. पासून ते थेट म्हातारपणी आपण नेमके कसे दिसू, अशा गंमतीदार गोष्टीही असतात. लोक ते आवडीने पाहतात. गंमत म्हणून आपणही त्या खाली दिलेल्या 'लिंक' वर 'क्लिक' करून आनंद घेत असतो. खरंतर, त्या गोष्टींचा आपल्या वर्तमानाशी काडिमात्रही संबंध नसतो पण स्वप्नरंजन करायला काय हरकत आहे, अशी मानसिकता सध्या मूळ धरू लागलीय. हे नेमकं काय असेल, याची आपल्याला कल्पना आहे? याच गोष्टीला 'ए. आय.' (अर्थात 'कृत्रिम गुणवत्ता' - आर्टिफिशियल इंटेलिजन्स) म्हणतात.

माणसाला जिथे विशेष बुद्धीची गरज असते, ती बरीच कामे आता संगणकिय प्रणाली करू लागल्या आहेत, हे तर तुम्ही जाणताच. 'ए. आय.' (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) म्हणजे नेमकं काय? ती कशी काम करते? तुम्हाला आठवत असेल, २०११ साली अमेरिकेतली 'जेपर्डी' नावाची एक प्रश्नमंजुषा तेव्हा चर्चेत होती. तीन स्पर्धक असायचे. त्यात नेमकी 'एकच' व्यक्ती ती स्पर्धा जिंकायची. बाकीचे दोन स्पर्धक खरंतर लेचेपेचे नव्हते. त्यातल्या एकाचं सलगपणे ७२ वेळा अपराजित राहण्याचं सातात्य होतं, तर दुसऱ्याने आजपर्यंतचे सर्वात मोठे बक्षिस कमावलेले होते. परंतु या दोघा दिग्गजांना चारी मुंड्या चीत करणारा तिसरा, हा मानव नसून ती चक्क एक संगणकीय प्रणाली होती. 'आय. बी. एम. वॉटसन' नावाच्या या बुद्धिमान प्रणालीने मानवाचा, त्याच्याच स्पर्धेत पराभव केला होता. ही होती 'संगणकात' वापरली जाणारी जबरदस्त बुद्धिमान प्रणाली. यामागे होतं ते.. 'ए. आय' (अर्थात 'कृत्रिम गुणवत्ता' - आर्टिफिशियल इंटेलिजन्स)! आधी संशोधन क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात मानवी बुद्धीप्रमाणे कार्य केलं जात असे. याला 'तज्ज्ञ प्रणाली' (याला 'एक्सपर्ट सिस्टिम' अशी संज्ञा होती.) म्हणत असत. उदाहरणार्थ - हवामान खात्यातले तज्ज्ञ वगैरे! सध्याचं युग हे 'तंत्रज्ञानाचं' युग आहे. 'ए. आय' हा केवळ एक सामान्य शब्द नसून तो अत्यंत वेगाने बदलणाऱ्या जगातला,

एक अत्यंत बलवान घटक ठरणार आहे. खरंतर, जेव्हापासून नवनवी यंत्रे संशोधन करून बनवली जात होती, त्याचं मूळ हे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' मध्येच होतं. फक्त त्याला 'ए.आय.' हे नामाभिदान प्राप्त झालं नसावं. आता 'ए.आय.' तर आपल्या मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक ठरणार आहे. 'ए-आय' हा फंडा, आता तर 'सिव्हिल', 'मॅकेनिकल', 'इलेक्ट्रीकल इंजिनियरींग' या क्षेत्रातच नव्हे तर 'ऑटोमोबाईल इंजिनियरींग' मध्येही वापरला जात आहे. तुम्ही पाहिलंच असेल. आज उपलब्ध झालेल्या 'ई-बाईक्स', तसंच 'ई-कार्स' मध्ये अक्षरशः 'ए. आय' चा उपयोग केलेला आढळतो. संगणकिय तंत्रज्ञानातही 'ए. आय' हे आपलं एक सन्माननीय व अद्यायावत असं अस्तित्व राखून आहे. तर.. शेवटी 'ए. आय' मुळे संपूर्ण जगातील कला आणि साहित्यविश्वच नव्हे तर वैद्यकिय क्षेत्र, पोलिस इंटेलिजन्स वगैरे क्षेत्रातही त्याचा शिरकाव होऊन येणाऱ्या काळात, त्या क्षेत्रात आश्चर्यकारक स्थित्यंतरं पहायला मिळणार आहेत, यात शंकाच नाही! 'रोबो' सारखे यंत्र तर माणसाप्रमाणे बोलतं, काम करतं. तुमच्या घरात 'अलेक्सा' आहे ना! अहो, ते सुद्धा या 'ए.आय.' टेक्नॉलॉजीतूनच निर्माण झालंय. 'गुगल-मॅप' मध्येही ते आहे. 'क्रूझ' ही देखील 'ए.आय.' वापरून 'रोबो-टॅक्सी' सेवा देणारी पहिली कंपनी ठरली आहे. आपण जेव्हा 'लॅपटॉप' वर काम करत असतो तेव्हा ज्या 'कमांड' आपण देतो त्यानुसारच ते काम करतं. परंतु 'कृत्रिम बुद्धिमत्तेव्दारे' मशीन स्वतः निर्णय घेतं. आपल्या बुद्धिमत्तेनुसार कमांड तयार करतं, की पुढचं काम काय व कसं करायचं आहे.

'ए. आय.' ही 'टेक्नॉलॉजी' मानवनिर्मितच आहे. परंतु निर्जीव यंत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून विचार करण्याची क्षमता बहाल करणारी आहे. 'ए. आय.' हे उत्पादन व औद्योगिक क्षेत्रात नवा स्त्रोत आणेल, क्रांती घडवून आणेल असं तज्ज्ञमंडळी आज छातीठोकपणे सांगत आहेत. यात तथ्य आहे! सध्या जगभरात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स रिसर्च सेंटर्स' उपलब्ध झाली आहेत. तिथे नवनवीन प्रयोग सतत होत असतात तसंच शिक्षणही दिलं जातं. अनेक शैक्षणिक संस्थांना आता परिणाम आधारित (रिझल्ट ओरिएंटेड) शैक्षणिक साधनांचे महत्त्व पटू लागले आहे. यामुळे 'उच्चशिक्षण' पद्धती हळुहळू पारंपरिक शिक्षणाच्या कोषातून बाहेर येऊ लागली आहे. 'ऑनलाईन कंपन्या' आपल्या 'ए.आय.' मार्फत ग्राहकांना अनेक चांगल्या सेवा देऊ लागल्या आहेत. 'ए. आय.' आधारित नोकऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. उपयोजनांची गती सुद्धा झपाट्याने वाढली आहे. नवीन विकसित होत असलेल्या या तंत्रज्ञानाच्या उदयामुळे 'ए. आय.' करिअरकडे तरूण मुले आकर्षित होत आहेत, ही बाब खचितच समाधान देणारी आहे. सध्या 'इंटरनॅशनल स्कूलमध्ये' हा विषय समाविष्ट केला जाणार आहे, किंबहुना आगामी काळातलं प्रमुख संस्थांमधील शिक्षण, हे याच दिशेनं जाणारं असेल, असा या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचा दावा आहे.

तुम्हाला हल्लीच्याच 'ओम शांती ओम' (२००७) या सिनेमातलं.. 'धूम ताना..' हे गाणं आठवतंय? या गाण्यात वयाने तरूण दिसणाऱ्या 'सुनिल दत्त', 'राजेश खन्ना', 'जितंद्र' यांची सादरीकरणे आहेत, हे तुम्ही पाहिलंच असेल! ते त्यांच्या त्या वयात आणि त्या शूटमध्ये प्रत्यक्ष होते का? नाही ना! मग हे कसं जमलं बुवा!? हा प्रश्न माझ्या सारख्या सर्वांनाच नक्कीच पडला असेल! तर.. अशा प्रकारचं तंत्रज्ञान हे (त्या काळात व आज सुद्धा) आमच्या फिल्म-इंडस्ट्रीत केवळ एक 'एस.एफ.एक्स. इफेक्टस्' तंत्रज्ञान म्हणून ओळखलं जातं. (त्या काळात 'ए. आय.' ही संकल्पना कुठेच नव्हती!) खरं तर ही कमाल त्या त्या, अभ्यासू अशा तंत्रज्ञाची! त्यांना माझ्यातर्फे एक मनापासून सॅल्यूट! किती जबरदस्त सादरीकरण होतं ते! या गाण्यात त्यांनी आपल्याला अवगत असलेलं तंत्रज्ञान वापरून काय केलं माहीत आहे? चक्क 'आम्रपाली' (१९६६) मधलं एक सुनील दत्तचं 'फूटेज', तर 'सच्चा झूठा' (१९७०) मधल्या राजेश खन्नाचा एक सीन आणि 'जय-विजय' (१९७७) मधल्या जितेंद्र यांच्या सीन्सवर खूप अभ्यास करून. त्या अमुक फुटेजचा या गाण्यात, अगदी योग्य जागी औचित्यपूर्ण वापर करत, हे गाणं सजवलं आहे! आत्ता त्याला त्या काळात 'ए. आय.' तंत्रज्ञान अशी संज्ञा प्राप्त झाली नसेल.. पण त्यांनी ते केलंय! ही संकल्पना राबवणाऱ्या व नेहमी

नवनवोन्मेषशाली प्रयोग करण्याने झपाटलेल्या 'फराह खान' या आमच्या 'व्हीनस' कंपनीशी अत्यंत जिव्हाळयाचे ऋणानुबंध असलेल्या जिनियस 'फराह खान' यांना माझा मनापासून एक कडक सॅल्यूट!

हे झालं 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चं तंत्रज्ञान, यंत्रे, संशोधन या क्षेत्रातील कार्य! परंतु हीच 'ए. आय. टेक्नॉलॉजी' आपल्या संगीतक्षेत्रात सुद्धा येतेय, ही बाब कुणालाही सहज पचणारी नाहीय. मात्र यात सुद्धा मत-मतांतरे आहेत. आपण दोन्ही बाजू अभ्यासायला काहीच हरकत नाही. ('आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयावर 'गुगल सर्च इंजिन' वर या विषयी बरीच माहिती आहे. ती नक्कीच अभ्यासा.. ही नम्र विनंती.)

तर, हा विषय इथे घेण्याचं कारण हेच, की भारताला पहिला 'ऑस्कर' मिळवून देणारा आपला 'रहेमान' सध्या या 'ए. आय' मुळे चर्चेत आला आहे. 'सोनी म्युझिक' ने दि. २९ जानेवारी, २०२४ रोजी ट्विटवरून माहिती दिली होती की, आपल्या संगीतकार 'ए. आर. रहेमानने' दिवंगत गायक 'बंबा बाक्या' आणि 'शाहुल हमीद' यांचे




आवाज 'ए. आय.'च्या सहाय्याने पुनरुज्जीवित केले आहेत. सुपरस्टार रजनीकांत अभिनीत 'लाल सलाम' (२०२४) या तामिळ चित्रपटासाठी एक गाणे, त्यांच्याच आवाजात रेकॉर्ड करून सादर केलं आहे. संगीतक्षेत्रातील सर्वांचेच डोळे विस्फारले! आता हे काय नवीन? असं प्रश्नचिन्ह.. आमच्या 'म्युझिक-इंडस्ट्रीतील' दिग्गज संगीतकार, प्रथितयश गायक, ज्येष्ठ वादक, उदयोन्मुख टेक्निशियन तसंच आम्हा पत्रकार मंडळींच्या चेहऱ्यावर होतं. काही लोकांना तर रहेमानसारख्या दिग्गज संगीतकाराने, 'ए. आय'चा संगीतात केलेला वापर खटकला आहे, अणि ते आपल्या प्लॅटफॉर्मवर बिनधास्त बोलूनही दाखवताहेत. तर काहींनी रहेमानच्या कृतीचं कौतुक आणि समर्थन सुद्धा केलं आहे, काहींनी तर त्याला चांगलेच खडेबोल सुनावले आहेत. साऊथच्या 'सोशल मीडियावर' तर आग लागल्यागत बरेच लोक रहेमानवर टिका करताना दिसत आहेत. ट्रोल करताना दिसत आहेत! ('ए. आर. रहेमान' किती सुज्ञ, विचारी आणि मॅच्युअर आहे पहा. कोरोना काळात देशातीलच नव्हे तर जगभरात लाखो फॅन्स असलेल्या 'डॉ. एस.पी. बालसुब्रमण्यम' यांचा अकाली मृत्यू झाला होता. 'एस्. पी.' आणि 'ए. आर. रहेमान' यांची घनिष्ट मैत्री असूनही

त्याने या प्रयोगासाठी त्यांचं 'व्हाईस-मॉडेल' वापरण्याचं कृत्य केलं नाही. तसं केलं असतं तर.. बाप रे! केवढा 'इश्यू' केला गेला असता याची कल्पनाच न केलेली बरी!) तर.. 'लाल सलाम' (९ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रदर्शित) चित्रपटात 'थिमिरी येजुदा..' असे शब्द असलेलं, गीतकार 'स्नेहन्' यांचं गाणं 'दिवंगत बंबा बाक्या, शाहुल हमीद' आणि दिप्ती सुरेश, अक्षय शिवकुमार यांच्या आवाजात रेकॉर्ड केलं आहे. हे गाणं २६ जानेवारी, २०२४ रोजी 'श्री लिओ मुत्थु इनडोअर स्टेडियम' मध्ये थाटामाटात प्रकाशित सुद्धा करण्यात आलं होतं. आपणा सर्वसामान्यांसाठी हा चक्क एक हादरवणारा मामला आहे! परंतु, तज्ज्ञ लोकांकडून लगेचच सांगण्यात आलं की ही 'तिकडमबाजी/चोरी/लबाडी' नाहीय! कारण यावर 'रहेमानने' आधीच स्पष्टीकरण दिलेलं आहे! रहेमानने आपली बाजू मांडताना अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे की.. 'आम्ही या दिवंगत गायकांच्या आवाजाचा 'ए. आय'च्या माध्यमातून प्रयोग करण्याआधी, त्यांच्या कुटुंबियांकडून रितसर परवानगी घेतली होती..' रहेमान, याबाबत पुढे सविस्तर बोलताना म्हणाला.. की, 'हा आमचा एक अभ्यास आहे, काहीतरी नवीन करण्याच्या हेतूने केलेला एक प्रयोग आहे! यात नवं काही करण्याची उर्मी आहे! पण खरं सांगायचं तर.. यामध्ये मला सध्यातरी केवळ ७० टक्के यश आलंय! तुम्हाला माहीतच आहे, लोक 'इंस्टाग्राम, टिक-टॉक आणि फेसबुकवर आपल्या विविध क्लिप्स, 'शो-रिल्स' शेअर करत असतात. माझ्या स्वतःच्या अत्यंत व्यस्त अशा दिनचर्येत केवळ विरंगुळा म्हणून मी आज सुद्धा त्या आवडीने पाहत असतो. 'फेसबुक'वर तर नवनव्या 'ॲप्स' बाबतीत माहिती, लिंक्स येत असतात. मला ते प्रकार अतिशय आवडतात. फावल्या वेळातली, निवांत क्षणातली माझ्यासाठी तरी ती करमणुक असते. मात्र त्यातून काहीतरी नक्कीच शिकायला मिळतं. एक दिवस अचानक, माझ्या एका सहकाऱ्याने 'निधन' झालेल्या एका 'दिवंगत' गायकाच्या आवाजाचा नमुना पाठवला होता. आपण यावर काहीतरी 'क्रिएटिव्ह' करूया, असं त्याने त्या 'व्हाटस्-ॲप' मॅसेजमध्ये लिहिलं होतं. आधी तो मॅसेज वाचल्यानंतर, खरंतर मी संभ्रमात होतो, परंतु तो प्रत्यक्ष भेटल्यानंतर, त्याने त्याविषयी माझ्यासोबत सविस्तर चर्चा केली. त्याची ती संकल्पना मला आवडलेल्यानेच की काय.. आम्ही त्या आवाजाचं अगदी अभ्यासपूर्ण परिक्षण केलं. होय! त्यात काही 'विशेष' नक्कीच होतं. सुदैवाने 'लाल सलाम' या चित्रपटाची दिग्दर्शिका 'ऐश्वर्या' सुद्धा काही तरी वेगळं करण्याच्या मूडमध्ये होती. तिला सुद्धा ही संकल्पना आवडली. मग काय! यावर काहीतरी नवं करायच्या ईर्षेने थेट मी, दिवंगत जिनियस गायक 'बंबा बाक्या' आणि 'शाहुल हमीद' यांच्या 'व्हॉईस-मॉडेल' वर अभ्यासपूर्ण संशोधन करायला घेतलं. ते काही प्रमाणात यशस्वी होतंय म्हणता, यासाठी रितसर परवानगी मिळावायलाच हवी हे ध्यानात आलं. 'बंबा बाक्या', जो माझ्या टिममध्ये असलेला अत्यंत जिव्हाळयाचा, परंतु त्या क्षणी दुर्दैवाने दिवंगत असलेला गायक, तसेच 'शाहुल हमीद' या माझ्या आणखी एका जिनियस गायकांच्या कुटुंबियांना मी प्रत्यक्ष जाऊन भेटलो. माझ्या सुदैवाने त्या सर्वांच्या सोबतची ती सांत्वनपर भेट अत्यंत आपलेपणाची ठरली होती. मी धाडस करून, त्यांना आमची संकल्पना सविस्तरपणे सांगितली. त्या दिवंगत गायकांचे कुटुंबिय क्षणार्धात हळवे हाऊन म्हणाले, की.. 'तुमच्या या प्रयोगातून आमच्या वडिलांचं अस्तित्व जर नव्याने पुनरुज्जीवित होणार असेल, तर यापेक्षा आमच्यासाठी आनंददायक गोष्ट ती काय?' परंतु रहेमानने याबाबतीत हुरळुन न जाता, आपल्या इथल्या 'कॉपिराईटस्' कायद्यानुसार, सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आणि त्यानंतर त्यांना यथोचित मानधन देऊन हे नव्या प्रकारातलं सादरीकरण केलं!.. काहीही असो! हा प्रकार आपल्या संगीतक्षेत्रासाठी खरोखरच धक्कादायक होता! कारण नंतर त्यावर तिथल्या लोकांच्या अतिशय तिखट अशा प्रतिक्रिया आलेल्या आहेत. लोक संतापले असल्याचे 'व्हिडिओज' वायरल झालेत, हेही ऐकलंय. बाय द वे! हा 'बंबा बाक्या' कोण? तर 'बंबा बाक्या' म्हणजे 'बक्कियाराज' (जन्म ३१ ऑक्टोबर, १९८०, मृत्यू दि. २ सप्टेंबर, २०२२)! तो रहेमानच्या 'टीम' मधलाच त्याचा जिव्हाळयाचा मित्र होता! आणि 'शाहुल हमीद' (१९५३-१९७८) हा कोण? तर एक जिनियस तामिळ पार्श्वगायक! (तो रहेमानसोबत 'थिरुडा थिरुडा..' मध्ये होता.) तर.. 'थिमिरी येजुदा..' हे गाणं सुपरस्टार रजनीकांतची मुलगी 'ऐश्वर्या' दिग्दर्शित 'लाल सलाम' या चित्रपटात आहे. ('यू-ट्युब' वर हे सादरीकरण नक्की पहा!) या बाबतीत रहेमानला नवं काहीतरी केल्याबद्दल इतका आनंद आहे की, तो व्यक्त होत

म्हणाला.. 'ए. आय.' हे सध्याच्या तंत्रज्ञानातलं 'हॉट-बटन' वापरून, आपल्या भूतकाळातील अनेक दिग्गज गायकांचे 'व्हाईस-मॉडेल' वापरत, नवनवे आविष्कार आपण सहज सादर करू शकतो. ते आपल्या मानसिकेतेला नक्कीच आनंद देऊ शकतील. आपल्या हृदयात मानाचं स्थान असलेल्या अत्यंत आवडत्या, परंतु दिवंगत असलेल्या गायकाचा आवाज, 'ए. आय.'च्या सहाय्याने पुनरुज्जीवित झाला आहे, ही गोष्टच सुखद एहसास देणारी आहे. फक्त, त्या-त्या गायकांच्या वारसांनी आमच्या, या प्रयोग म्हणून करत असलेल्या आविष्कारासाठी आपलेपणाने स्वीकृती द्यायला हवी. तसंच हा प्रयोग करून आविष्कार करणाऱ्या तंत्रज्ञांनी, त्यांना यथोचित मानधन देत त्याची कायदेशीर पूर्तता करायला हवी. यावर 'ए. आर. रहेमान'च्या, व त्याच्यावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या अनेक समर्थकांनी त्याचं कौतुक करत त्याला आपलेपणाने विनवलं आहे की.. 'रहेमानसह अनेक जिनियस संगीतकारांनी 'एस. पी. बालसुब्रमण्यम'च नव्हे तर 'महंमद रफी', 'किशोर कुमार', 'मुकेश', 'तलत महमूद', इतकंच नव्हे तर ग़ज़ल गायक 'जगजीत सिंग' आणि 'लतादीदीं' यांचे आवाज योग्य त्या सादरीकरणासाठी नक्कीच पुनरुज्जीवित करावेत, यामुळे या आमच्या लाडक्या गायकांचा आवाज अजरामर होईल. हे तंत्रज्ञान नेमकं कसं आहे या उत्सुकतेपोटी अनेक जणांनी त्याचा अभ्यास करत, काही मस्त नमुने 'यू-ट्युब' वर सादर करायलाही घेतलेत. 'यू-ट्युब' वर 'ए. आय. सॉंग्स' एवढंच टाईप करा. जे काही समोर येतं त्याने आपण थक्क होऊन जातो. 'यू-ट्युब' वर तीनेक वर्षांपूर्वी 'मेरे सामनेवाली खिडकी में..' या 'फेस-रिप्लेस' प्रकारातील व्हिडिओत चक्क धोनी (किशोरकुमार), विराट कोहली (सुनील दत्त) तर अनुष्का (सायरा बानो) यांच्या जागी दिसतायत म्हणता आपण हादरलेलो ना! आता 'ए. आय.' या तंत्रज्ञानाचा वापर केलेली अनेक गाणी सापडतात. उदाहरणं द्यायची तर यात 'अब तेरे बीन जी लेंगे हम..' (आशिकी) व 'ऐ काश के हम..' (कभी हां कभी ना) ही 'कुमार सानू'ची गाणी दिवंगत गायक 'किशोरकुमार'च्या आवाजात तर 'रब ने बना दी जोडी' मधलं 'हौले हौले..' चक्क महंमद रफीच्या आवाजात ऐकायला मिळतं. इथे 'ए. आय.' तंत्रज्ञान कसं वापरायचं याचे शैक्षणिक व्हिडिओज सुद्धा आहेत. जर पुढे या तंत्राचा उपयोग करून सपूर्ण गाण्यांचं 'प्रोग्रॅमिंग', 'ऱ्हिदम-म्युझिक' वादन, 'स्पेशल-इफेक्ट्स्' सादर झाले तर आमचं काय? असा प्रश्न हातावर पोट असलेल्या आमच्या 'म्युझिक-इंडस्टीतील' वादकांना पडला आहे. 'तम्मा तम्मा लोगे..' (थानेदार-१९९०) या पहिल्या 'संगणकिय-प्रोग्रॅमिंग' असलेल्या गाण्याच्या सादरीकरणानंतर, तोच 'ट्रेण्ड' येऊन, पुढे अक्राळ-विक्राळ रूप धारण करताच वादकांना आपापली वाद्ये घरातल्या पोटमाळ्यावर टाकायला लागली होती. हा नजीकचा इतिहास पाहता, आता मात्र त्यांची पाचावर धारण बसणं बसलीय. काहीही असो.. स्पष्टपणे सांगायचं तर, 'ए. आय.' हे उत्पादन व औद्योगिक सह अनेक क्षेत्रात भले नवा स्रोत आणेल, क्रांती घडवून आणेल. परंतु 'ए. आय.' ही गोष्ट आपल्या संगीतक्षेत्रात ज्याप्रकारे आली आहे, ती प्रथमदर्शनी तरी आपल्याला सहज पचणारी बाब नाहीय. परंतु यावर बरंच संशोधन होणार, सतत नव्याच्या शोधात असणारे तंत्रज्ञ त्यात नवनवीन प्रयोग करणार. संगीतक्षेत्रातले 'टेक्नो-सॅव्ही' संगीतकार, वादक यातून नवीन गोष्टींचा आविष्कार करणार, यात शंकाच नाही. मात्र, भविष्यात आणखी काय काय होणार हे याक्षणी 'ए. आय' सुद्धा सांगू शकणार नाही. आापण केवळ म्हणायचं, की.. 'तुका म्हणे उगी रहावे, जे जे होईल ते ते पहावे, चित्ती असो द्यावे, समाधान!' संगीतक्षेत्रात 'ए.आय.' चा वापर 'शाप की वरदान', हे मात्र येणारा काळच ठरवेल, हे मात्र नक्की!

**© - अनंत पावसकर** (ज्येष्ठ पत्रकार, संगीत संयोजक)


**anantpavaskar@gmail.com** **(9820022417)**


# संगीतकार 'ए. आर. रहमान' यांचे चित्रपट.. फक्त फोटोवर 'क्लिक' करा.





























GEETHA ARTS
ALLU ARVIND
THE GENTLEMAN
A MAHESH BHATT FILM



RANGEELA



ishtar
HUMSE HAI MUQABALA
& A.R.RAHMAN'S ALL - TIME HITS



Mani Ratnam's
BOMBAY
A.R. RAHMAN
MEHBOOB



ALAYAM
PRESENTS
THIRUDA THIRUDA
MANIRATNAM
A. R. RAHMAN
VAIRAMUTHU
थिरूडा
थिरूडा



PolyGram
LOVE BIRDS
MUSIC A.R. RAHMAN



A.R.RAHMAN'S Biggest Musical Bonanza !
A.R.RAHMAN
JHAMU SUGHAND
PRESENTS
HINDUSTANI
THE BIGGEST FILM EVER MADE ON THE INDIAN SCREEN
DIRECTOR SHANKAR
LYRICS P.K.MISHRA


GRAMCO FILMS PRESENT AVM PRODUCTIONS
SAPNAY



VENUS
PRESENTS
DUNIYA DILWALON KI



JEANS
SHANKAR



DAUD
FUN ON THE RUN



ishtar
Dil Se..
A MANI RATNAM FILM



Mr. ROMEO


Kabhi Na Kabhi
Music : A. R. RAHMAN


Doli Saja ke Rakhna
Music : A. R. RAHMAN



DIL HI DIL MEIN
MUSIC A.R.RAHMAN
LYRICS MEHBOOB



The Legend of
BHAGAT SINGH
Music : A. R. RAHMAN



AN AAMIR KHAN PRODUCTION
LAGAAN
Once upon a time in India



A SUBHASH GHAI Film
Taal
Directed By: Subhash Ghai
Lyrics By: Anand Bakshi
Music By: A. R. Rahman



ONE 2 KA 4



From the award winning director of 'Fire'
A film by Deepa Mehta
EARTH
Powerful...
a remarkable movie
I strongly recommend.
Music : A. R. RAHMAN



zubeidaa
THE STORY OF A PRINCESS
MUSIC A R RAHMAN
LYRICS JAVED AKHTAR



music a r rahman
tehzeeb



MANMOHAN SHETTY
PRESENTS
THAKSHAK
MUSIC A.R. RAHMAN
A GOVIND NIHALANI FILM



ishtar
PUKAR



MYCHAEL DANNA
AR RAHMAN
WATER



yash raj films
Saathiya



ONE OF THE TOP 250 FILMS OF WORLD
Swades
We, the people
Music : A. R. RAHMAN



SAHARA INDIA PARIWAR
TIMES music
BOSE
the
Forgotten hero



KISNA
IM FEUER DER LIEBE
Music : A. R. RAHMAN


mangal pandey
THE RISING


Meenaxi
Tale of 3 Cities
Music : A. R. RAHMAN



A MANI RATNAM FILM
GURU
MUSIC IN STORES



Jodhaa
Akbar
Music : A. R. RAHMAN



BHANGRA
Rang
De Basanti
Music : A. R. RAHMAN



Sivaji
The boss
a r rahman
AVM




































'जय हो!!..' - संगीतकार 'ए. आर. रहेमान' - लेखक : अनंत पावसकर



ROCKSTAR
Music : A. R. RAHMAN



99
SONGS
Music : A. R. RAHMAN


MOM
Music : A. R. RAHMAN



OK
JAANU



Mili
IN THEATRES 4TH NOV.
Music : A. R. RAHMAN



A FOX STAR STUDIOS PRODUCTION
Dil Bechara
Music : A. R. RAHMAN


Beyond
the Clouds



SACHIN
A BILLION DREAMS
Music : A. R. RAHMAN



TAMASHA
Music : A. R. RAHMAN


MiMi
Music : A. R. RAHMAN


जब तक
है जान
Music : A. R. RAHMAN



ATRANGi Re
Music : A. R. RAHMAN



THE FAKIR OF VENICE
Music : A. R. RAHMAN


a MANI RATNAM film
Yuva
UNCUT VERSION
Music : A. R. RAHMAN


Music : A. R. RAHMAN
2.0



SANJU
RHF



VICHARON KA YUDH
GANDHI GODSE
"EK YUDH"
Music : A. R. RAHMAN



ANIMAL
Music : A. R. RAHMAN


SHIKARA
The Untold Story of Kashmiri Pandits
Music : A. R. RAHMAN


HEROPANTI 2


ONE MAN
ONE BELIEF
ONE SPIRIT
ONE NATION
MAIDAAN
Music : A. R. RAHMAN


A NETFLIX FILM
AMAR SINGH
CHAMKILA
Music : A. R. RAHMAN


PIPPA
Music : A. R. RAHMAN


VANDE MATARAM
MAA TUJHE SALAAM
Music : A. R. RAHMAN

## ‘संगीतकार ए. आर. रहेमान’ यांच्या सर्वसमावेशक ‘यू-ट्युब - प्ले-लिस्टस्’

आपल्या ‘स्मार्ट-टी.व्ही’, ‘अलेक्सा’ किंवा ‘ब्ल्यू-टूथ स्पीकर’वर अवश्य आस्वाद घ्या!

(मला जे जे मिळालं ते मी इथे मनापासून सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.)

‘ए. आर. रहेमान’ यांची ‘बायोग्राफी’, मुलाखती (४१ ‘लिंक्स’)

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97RsYAzvQ8gLuQGvHtEx0z2&si=rFYzPFm-5_uPhQDs

‘ए. आर. रहेमान’ यांची गाणी (३२२ ‘लिंक्स’)

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95JiQlrp9ApO-m62roo03h_&si=k8JuWpsmpMrB7v4t

‘ए. आर. रहेमान’ यांची ‘फिल्मोग्राफी’ (२०३ ‘लिंक्स’)

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi9584-rWuGRlN09AVV7-61mr&si=_WGhIadonkis3JEE

तालसम्राट ‘ए. शिवामणी’ - (३२ ‘लिंक्स’)

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi950QIgJQxFIhRXsqN_iE52w&si=U1ede-WJ0Wzh4qUc

या लेखात ऊहापोह केलेल्या गीत/संगीताच्या संदर्भांची ही ‘प्ले-लिस्ट’

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95N3TW03nKaUBJvmf6pWCN8&si=ohyOL1EzC5SqSFvF

‘ए. आर. रहेमान’ यांनी संगीतबद्ध केलेलं गाणं गाण्याचा माझा एक प्रयत्न!

https://youtu.be/7b-uKVb8DPg?si=Q2jSSXMJHqrYfv15

**संकलन : अनंत पावसकर** (ज्येष्ठ पत्रकार, संगीत संयोजक)

♥